**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील  माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८१७/२००७**

१) श्री विजयकांत तुकडोजी शिंगाडे,
रा.फुले कॅालनी, नागपूर रोड,
भोजापूर, भंडारा-४४१९०४
ता.जिल्हा भंडारा. **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

३) जन माहिती अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण विभाग),
जिल्हा परिषद, गडचिरोली. **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता  गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२००७ रोजी (प्राप्त दिनांक १५.१२.२००७) राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयामध्ये आयोगाची नोटीस क्रमांक रामाआ/अपील/३४३१/२००७, दिनांक ७.१२.२००७ प्रमाणे नोटीस मिळाल्यानंतर " उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.), जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे पत्र क्रं.जिपग/बाकवि/स्था-१/३०७०/६२७/२००६, दिनांक ३०.९.२००६ अन्वये आवश्यक असलेली माहिती दिनांक ११.१०.२००७ ला प्राप्त झालेली आहे," असे कळविण्यात आलेले असल्यामुळे व माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे मान्य केलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्या येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे

**नागपूर**
**दिनांक २.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८२१/२००७**

१) श्री मो.फैयाज वल्द मो. मुख्तार,
द्वारा अब्दुल कुद्यस खान कॉम्प्लेक्स,
टेका मस्जिद के पास, सिध्दार्थ नगर, नागपूर. **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

३) जन माहिती अधिकारी तथा
मॅनेजर (बाटलीक प्लॅाट)
हिंदुस्थान पेट्रोलीयम कार्पोरेशन,
खापरी, ता.जिल्हा नागपूर. **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपील मेमो मध्ये मॅनेजर (बाटलीक प्लॅान्ट), हिन्दुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन, खापरी जिल्हा नागपूर अशा प्रकारे माहिती अधिका-याचा तपशिल दिलेला दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी सविता गॅस एजन्सी (डिलर) यांचेकडे दिनांक २२.१२.२००५ रोजी माहिती मागण्यासाठी अर्ज दाखल केल्याचे दिसून येते. त्यानंतर दिनांक २३.१.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. परंतु, हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन ही केंद्रिय शासनाचे सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयाविरुध्द द्वितीय अपील हे केंद्रिय माहिती आयोग यांचेकडे दाखल करावयास पाहिजे होते. राज्य माहिती आयोगास कोणत्याही प्रकारची अधिकारीता केंद्रिय सार्वजनिक प्राधिकरणाच्या संबंधात नाही. व त्यामुळे सदरचे अपील हे खारिज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन केंद्रिय सार्वजनिक प्राधिकरण या कंपनीच्या संबंधात व केंद्रिय माहिती आयोगास अधिकारीता असल्याने व राज्य माहिती आयोगास अधिकारीता नसल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील  माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८३०/२००७**

१) श्री कुदूस शे. गफूर
रा. शिरजगांव कसबा,
ता.चांदूर बाजार जिल्हा- अमरावती-४४४८१ **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी (उ.श्रेणी)
पंचायत समिती, चांदूर बाजार,
ता.चांदूर बाजार, जिल्हा अमरावती.

३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्राम पंचायत कार्यालय शिरजगांव कसबा,
ता. चांदूर बाजार, जिल्हा अमरावती. **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली. अपीलकर्ता  व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२००६ रोजी सचिव, ग्राम पंचायत कार्यालय, शिरजगांव यांचेकडे ग्राम पंचायत शिरजगांव (कसबा)चे मासिक सभा व ग्राम सभा दिनांक १ मे, २००५ ते ३० एप्रिल, २००६ मध्ये झालेल्या सर्व सभांचे कार्यवृत्त मिळण्याबाबत, सर्व ग्राम पंचायत सदस्यांचे घर टॅक्स व पाणी पुरवठा कर टॅक्स जमा व थकीत दिनांक १ जानेवारी, २००५ ते ३० मार्च, २००६ मिळण्याबाबत. सदरची माहिती व्यक्तीशः कार्यालयातून घेवून जाणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १८.५.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये रुपये ८५५०/- शुल्काचा भरणा कार्यालयात करावा किंवा शासकिय कोषागारात रक्कम जमा करुन चालनची प्रत या कार्यालयात जमा करुन माहिती घेवून जावे, असे कळविलेले दिसून येते.

सदरच्या निर्णयाच्या विरुध्द दिनांक २९.५.२००६ रोजी ग्राम पंचायतीने अवाजवी माहिती शुल्क आकारणी करुन शासन आदेशाचा भंग केल्याचे कारण देवून प्रथम अपील, प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केल्याचे दिसून येते. गट विकास अधिकारी यांचेकडे दिनांक २.६.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी खुलासा दाखल करताना असे नमूद केलेले दिसून येते की, " मी दिनांक २९.५.२००६ रोजी अपील दाखल केली, माझ्याकडून रुपये ८५५०/- जमा करुन माहिती घेवून जाण्याचे पत्रानुसार फी जास्त होते म्हणून अपील दाखल केले आहे. मी दिनांक २५.७.२००५ च्या मासिक सभेस हजर होतो. सभेतील ठराव क्रमांक ६ नुसार पारित ठराव रुपये ३० प्रमाणे दर आकारुन ठरावाची सत्यप्रत नागरिक, सदस्य यांना द्यावी असे कार्यवृत्तात नमूद आहे. परंतु, सदरचा ठराव मासिक सभेत चर्चील्या गेलेला नाही किंवा या दिनांकात प्रोसिडींग बुकावर माझ्या देखता नोंदविले गेले नाही, म्हणून मी या ठरावाशी सहमत नाही किंवा हा ठराव मला मान्य नाही."

३. दिनांक २६.६.२००६ रोजी पुन्हा गट विकास अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल केलेला दिसतो. पुन्हा दिनांक १२.७.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी अर्ज केलेला दिसून येतो. पुन्हा दिनांक ७.८.२००६ रोजी गट विकास अधिकारी यांचेकडे तक्रार केल्याचे दिसून येते. परंतु, दिनांक २६.८.२००६ रोजी रुपये ७१२/- चा भरणा अपीलकर्ता यांनी केलेला असून त्यांना कच्ची पावती मिळाली आहे. त्याकरीता सुध्दा दिनांक २८.८.२००६ रोजी कच्ची पावती मिळाली पण पक्की पावती मिळाली नाही अशा प्रकारची तक्रार केलेली दिसून येते. दिनांक २८.८.२००६ रोजी पुन्हा गट विकास अधिकारी यांचेकडे तक्रार केलेली दिसून येते. माहिती मिळण्यासाठीचे अर्ज हे एक सदस्य करतात व मात्र गट विकास अधिकारी यांचेकडे पुढील पत्रव्यवहार हा तीन-तीन व्यक्तींनी केलेला दिसून येतो. द्वितीय अपील मात्र तीन व्यक्ती करतात. सदरच्या अपीलाचा निर्णय दिनांक ३१.७.२००७ रोजी घेण्यात येवून व निरनिराळया तक्रार अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहाराचे संदर्भामध्ये दिनांक ४.९.२००६ रोजी सविस्तर मुद्येनिहाय खुलासा दाखल केलेला आहे. व तरी सुध्दा गट विकास अधिकारी यांनी दिनांक १९.१०.२००६ रोजी सचिव, ग्राम पंचायत यांचे विरुध्द आपण जाणून बुजून अपीलकर्ता यांना माहिती पुरवित नाही. तरी हा आदेश प्राप्त झ ााल्यापासून २४ तासाचे आंत स्वत: जातीने अपीलकर्ता यांना त्यांचे मागणीप्रमाणे माहिती प्रत्यक्ष समक्ष देवून पुरवावी व आपण दिनांक २६.८.२००६ पासून दर दिवशी

७५०/- रुपये दंडास महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० नुसार पात्र आहे असा निष्कर्ष काढलेला आहे व त्याचा पत्राची प्रतिलीपीमध्ये श्री शे. कुदूस शे. गफूर, श्री मुरलीधर रा. वानखडे व श्री दिलीप गं. दाभाडे यांना संबोधून दिलेल्या उत्तरात आपणाकडे ग्राम पंचायत कर्मचारी माहिती घेवून आले असता आपण ती स्विकारली नाही व दिनांक २८.८.२००६ ला कार्यालय उघडण्यापूर्वी तक्रार दाखल केली. यावरुन आपण शासकिय कर्मचा-यास काम करुन देत नाही. जाणून बुजून तक्रारी करता अशी माझी धारणा होत आहे. आपण माहिती न स्विकारल्यास यापुढे याबाबत आपल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी असाही निष्कर्ष काढलेला आहे. याबाबत अपील क्रमांक ८३१/२००७ मध्ये संपुर्ण विवेचन करण्यात आलेले असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांच्या आकलन शक्ती बध्दल निष्कर्ष काढलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी जो निष्कर्ष काढला आहे तो ग्राम पंचायत सचिव यांचे विरुध्द जसा आहे तसाच माहिती मागणा-या व्यक्त्ीच्या विरुध्द सुध्दा आहे. तसेच अधिकारिता नसताना माहिती अधिका-यास दंड करण्याच्या संदर्भातील त्यांचा निर्णय सुध्दा हा अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे नाही व अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे.

४. माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने वर नमूद केल्याप्रमाणे तसेच अपील क्रमांक ८३१/२००७ मध्ये निष्कर्ष केल्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न हा माहिती अधिकारी यांनी केलेला दिसून येतो व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांना अधिकारीता नसल्यामुळे सदरचा दंडाचा निर्णय व रुपये १०,०००/- ची केलेली शास्ती हा रद्द करण्यास पात्र आहे.

५. असे असले तरी सदरच्या अर्जाच्या संदर्भात व अपीलकर्ता यांनी माहितीचे करीता खर्चाचा भरणा केलेला असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील. माहिती उपलब्ध असताना घेतली नाही त्याबध्दलचा निष्कर्ष सुध्दा वर केलेला आहे. त्यामुळे पुन्हा त्याबध्दलचा निर्णय या अपीलात

केलेला नाही. कारण माहितीचा अर्ज वगळून प्रत्येक अर्जावर तीन व्यक्तीच्या स्वाक्ष-या आढळून येतात.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अर्जाचे अनुषंगाने व भरणा केलेल्या खर्चाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसांचे आंत त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्या पासून स्वत: ग्राम पंचायत कार्यालयात जावून माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक यांचेकडून त्यांच्या अर्जात मागीतल्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक यांचे विरुध्द शास्ती लादण्याचा आदेश हा त्यांना अधिकारिता नसल्यामुळे रद्द करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८३४/२००७**

१) श्री मो.नवाबखॅान हबीब खॅान,
प्लॅाट नं. १३८, जयभीम पार्क जवळ,
सिध्दार्थ नगर, टेका, नागपूर - १७ **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
हिन्दुस्थान पेट्रोलियम कार्पोशन लि.
कामठी रोड, नागपूर (एलआयसी बिल्डींग)
नागपूर.

३) जन माहिती अधिकारी तथा
मॅनेजर, सविता गॅस एजेन्सी,
केशव भवन, १० नंबर पुल, लष्करीबाग,
कामठी रोड, नागपूर. **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी यांनी खुलासा दाखल केलेला आहे.

२. अपीलकर्ता यांनी सविता गॅस एजन्सी कडे माहिती मागण्यासाठी अर्ज दाखल केलेला दिसून येते. सविता गॅस एजन्सी ही खाजगी कंपनी आहे. व त्या कंपनीने माहिती दिली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी , हिंदुस्थान पेट्रालियम यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये हिंदुस्थान पेट्रोलियमचे व्यवस्थापक हे प्रथम अपीलीय अधिकारी नाहीत. व सविता गॅस एजन्सीच्या निर्णया विरुध्द सुध्दा मुख्य कार्यकारी अधिकारी हे सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी नाही. हिंदुस्थान पेट्रोलीयम कंपनी तर्फे माहिती उपलब्ध करुन दिली जावू शकते. परंतु, हिंदुस्थान पेट्रोलीयम कंपनीच्या माहिती अधिकारी यांचेविरुध्द सुध्दा किंवा प्रथम अपीलाच्या निर्णया

विरुध्द सुध्दा द्वितीय अपील हे केंद्रीय माहिती आयोगाकडेच दाखल करता येते. हिंदुस्थान पेट्रोलीयम कंपनी ही केंद्रिय शासनाचा उपक्रम असल्यामुळे राज्य माहिती आयोगास अधिकारिता नाही व अधिकारितेच्या अभावी सदरचे अपील हे खारिज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे केंद्रिय शासनाचा उपक्रम हिंदुस्थान पेट्रोलीयम कंपनीच्या निर्णया विरुध्द असल्यामुळे राज्य माहिती आयोगास अधिकारीता नसल्याने अधिकारीतेच्या अभावी सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**
**अपील क्रं. ८३८/२००७**

१) श्री डॉ. सैफुद्यीन अहमद
रा. रहिम मार्केट पहिला माळा,
बसम स्टॅन्ड अकोला- ४४४००१ **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

३) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
होमिओपॅथीक मेडिकल कॅालेज,
अकोट रोड, अकोला, ता.जि. अकोला.

**उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे महाराष्ट्र राईट टू इनफार्मेशन ॲक्ट, २००५ चे कलम ११(१) अन्वये अपील दाखल केलेली दिसून येते. प्रथम अपील केलेली दिसून येत नसल्यामुळे त्याबध्दलची द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती दिलेली दिसून येत नाही. अपलकर्ता यांनी दिनांक २.१.२००८ रोजी टपालाने राज्य माहिती आयोगाकडे खुलासा पाठविलेला दिसून येतो परंतु आज सुनावणीस स्वतः हजर नाही.

अपीलकर्ता यांच्या खुलाशाप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२००५ रोजी प्राचार्य, होमिओपॅथीक मेडिकल कॅालेज, आकोट रोड, अकोला यांचेकडे " आज रोजी पर्यंतच्या सर्व नोंदीसह माझ्या सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत पुरवावी, विद्यापिठाचे दिनांक २६.१०.२००४ चे पत्र क्रमांक MUHS/E-४/४५०८/४६९८/०४ नुसार आपण माझ्या पुर्वानुभवाची माहिती विद्यापिठाला मागीतली होती. त्यानुसार आपण माझ्या पुर्वानुभवाची माहिती ज्या पत्राद्वारे तसेच ज्या दस्तऐवजाच्या आधारे आपण माझ्या अनुभवाविषयी माहिती पुरविली त्या पत्राची व संपुर्ण दस्तऐवजाची सत्यप्रत पुरवावी. माहिती नोंदणीकृत डाकेने पाठवावी, " अशी माहिती मागीतलेली दिसून यते.

अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२००५ व दिनांक १८.७.२००५ रोजी जे दोन अर्ज माहिती मिळविण्यासाठी केलेले आहे, त्या वेळेस अर्जदार हे स्वतः प्रोफेसर व एच.ओ.डी. ॲनाटामी होते. व त्यावेळस डॉ. तिवारी हे प्राचार्य होते. आता अपीलकर्ता हे स्वतः प्राचार्य आहेत व त्यामुळे सदरच्या

सेवा पुस्तकाची माहिती त्यांनी उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रयत्न केला असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, सेवा पुस्तक त्यांना उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांनी तत्कालीन प्राचार्य डॉ. तिवारी यांना पक्षकार करावे व संस्थेचे अध्यक्षांना पक्षकार करावे अशी विनंती करणारा खुलासा दाखल केलेला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाचे जन माहिती अधिकारी हे जबाबदार असतात. आज डॉ. तिवारी हे जन माहिती अधिकारी नाहीत. तसेच अपीलकर्ता यांनी प्रथम अपील केलेले नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी सुध्दा नाही. त्यामुळे संस्थेचे अध्यक्ष यांना सुध्दा पक्षकार करुन घेता येत नाही. तसेच अपीलकर्ता हे स्वतःच प्राचार्य असल्यामुळे संस्थेचे जन माहिती अधिकारी आहे. व त्यामुळे सेवा निवृत्त झालेल्या किंवा बदलून गेलेल्या प्राधिका-यास पक्षकार करता येत नसल्यामुळे सदरची विनंती ही मान्य करता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील सुध्दा खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता हे स्वतः जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ८.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ७१९/२००७**

१) श्री शालीग्राम पांडूरंग मनवर,
ग्राम पंचायत कार्यालय, कुंभी,
पो.वारा (ज.) ता. मंगळूरपीर, जिल्हा वाशिम **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यपालन अधिकारी,
जिल्हा परिषद, वाशिम.

३) जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, वाशिम. ता.जिल्हा वाशिम.

**उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमतीने गैरहजर आहे. अपीलकर्ता हे दिनांक ६.१२.२००७ रोजी सुध्दा सुनावणीसाठी गैरहजर होते. आज प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाही. प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वाशिम यांनी सदरच्या सुनावणीसाठी कनिष्ठ लिपिक यांना पाठविले आहे.

२. राज्य माहिती आयोगाकडे जे द्वितीय अपील दाखल केले आहे त्या द्वितीय अपीलामध्ये शालीग्राम पांडूरंग मनवर व दिलीप नारायण कोल्हे असे दोन अपीलकर्ता यांनी नांवे आहेत. श्री दिलीप नारायण कोल्हे यांनी दिनांक ५.१२.२००५ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मंगळूरपीर यांचेकडे आसेगांव कोठारीचे केंद्र प्रमुख यांना निलंबीत करण्याबाबत दिनांक १.३.२००४, २.४.२००४, १८.५.२००४ ला तक्रारी दिलेल्या होत्या त्याबाबत कार्यवाही काय झाली याबाबत माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १६.१२.२००५ रोजी

" आसेगांव, कोठारी बीटचे केंद्र प्रमुख यांच्याबाबत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मंगळूरपीर यांचेकडून अहवाल मागीतला आहे. अहवाल प्राप्त होताच माहिति कळविण्यात येईल. माहितीकरीता सादर." तसेच सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २६.१२.२००५ रोजी " उपरोक्त विषयानुसार सखोल चौकशी संबंधीत केंद्र प्रमुख, केंद्र कोठारी व केंद्र आसेगांव मध्ये समाविष्ठ असलेल्या शिक्षकांची करावयाची आहे. त्यामुळे या चौकशीला अवधी लागेल. माहितीस्तव अर्ज सविनय सादर केलेला आहे," असे गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती मंगळूरपीर यांनी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांना कळविण्यात आलेले दिसते. परंतु दरम्यान अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००६ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेंकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यात श्री शालीग्राम पांडूरंग मनवर यांनी माहितीचा अर्ज दाखल केलेला नसताना सुध्दा त्यांना अपीलकर्ता म्हणून दाखविण्यात आलेले दिसते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २३.१.२००६ रोजी श्री दिलीप कोल्हे यांना उपरोक्त विषयानुसार तसेच संदर्भानुसार केंद्र कोठारी व केंद्र आसेगांव मध्ये समाविष्ठ असलेल्या केंद्र प्रमुख व सर्व शिक्षकांची चौकशी साठी अवधी लागेल असे पत्र प्राप्त झाले त्या पत्राची छायाप्रत पाठवित आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे पुन्हः दिनांक १०.१२.२००६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडे सरपंच, ग्राम पंचायत, कुंभी यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या प्रथम अपीला मध्ये वर नमूद केल्याप्रमाणे शालीग्राम पांडूरंग मनवर व दिलीप नारायण कोल्हे असे दोन अपीलकर्ता नमूद करण्यात आलेले आहे. माहितीचा अर्ज हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे दोघानीही केलेला असला तरी त्यावर तारीख दिसून येत नाही. दिनांक ५.१२.२००५ चा अर्ज गट विकास अधिकारी यांचेकडे केलेला दिसतो. दिनांक २३.१.२००६ चे उत्तर श्री दिलीप नारायण कोल्हे यांना दिलेले दिसते. अशाप्रकारे माहितीचा अर्ज करणे, त्याच्या निर्णया विरुध्द प्रथम अपील करणे व त्या निर्णयाच्या विरुध्द द्वितीय अपील करणे हे अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे अपेक्षित आहे. ज्या व्यक्तीनी अर्जच केलेला नाही, ती व्यक्त्ी प्रथम किंवा द्वितीय अपील दाखल करु शकत नाही.

३. असे असले तरी, श्री दिलीप नारायण कोल्हे यांचे नांव सर्व अर्ज व अपीलावर क्रमांक दोनवर दिसत असल्यामुळे त्यांना माहिती दिनांक २३.१.२००६ रोजी उपलब्ध करुन

दिलेली दिसते. सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या प्रक्रियेत दाखल केलेली कागदपत्रे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व प्रथम अपीलीय अधिकारी तसेच मुख्य कार्यपालन अधिकारी व स्वतः अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची आस्था दिसून येत नाही. माहितीच्या अधिकारातील अर्जाचे उत्तर देताना सुध्दा अशा प्रकारचा कायदा अस्तित्वात आहे व त्यात विशेष तरतूदी व विशेष जबाबदारी दिलेली आहे यांची कोणत्याही प्रकारची जाणिव गट शिक्षणाधिकारी किंवा शिक्षणाधिकारी किंवा मुख्य कार्यपालन अधिकारी यांना आहे असेही दिसत नाही.

1४. मुळात माहितीचा अधिकार या कायद्या अंतर्गत अर्ज करीत आहे याची जाणिव अर्जदारास सुध्दा नाही. व वर नमूद केल्याप्रमाणे अधिकारी किंवा कर्मचारी यांना सुध्दा दिसून येत नाही. नेहमीच्या प्रशासकिय कार्यपध्दती प्रमाणे कोणत्याही प्रकारचा विचार न करता उत्तर लिहून पाठविणे एवढेच या सर्व कागदपत्रावरुन दिसून येते. व त्याचे प्रतिबिंब दिनांक ८.१.२००८ रोजी प्रभारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, वाशिम यांनी आयोगास लिहिलेल्या पत्रात दिसून येते. तसेच जिल्हा परिषद कार्यालय, वाशिम यांचे दिनांक ४.१२.२००७ च्या पत्रात मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचेही उत्तरात दिसून येते.

५. असे असले तरी अपीलकर्ता क्रं.१ यांना अपीलकर्ता क्रं.२ चे माध्यमातून दिनांक २३.१.२००६ रोजी माहिती उपलब्ध झालेली आहे असे गृहीत धरुन सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता क्रं. १ यांना अपीलकर्ता क्रं. २ चे माध्यमातून माहिती उपलब्ध झालेली आहे असे गृहीत धरुन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांचेकडे माहितीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ९.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८४९/२००७**

१) सौ. पुष्पा भिमराव लोखंडे
रा. संभाजीनगर चिखली,
ता. चिखली, जिल्हा बुलढाणा -४४३२०१ **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक, भूमी अभिलेख, अमरावती.
अमरावती प्रदेश अमरावती. ता.जि अमरावती.

३) जन माहिती अधिकारी तथा
कार्यालयीन अधीक्षक, उपसंचालक भूमी अभिलेख
अमरावती प्रदेश अमरावती, ता.जि. अमरावती.

**उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हे हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.४.२००६ रोजी श्री व्ही.टी. मुळे, अ.भू.अ. बुलढाणा यांनी श्री बी.एन. लोखंडे यांचे विरुध्द दिनांक ९.६.२००५ च्या तक्रारी संबंधाने आपणाकडे सादर केलेल्या अहवालाच्या प्रति व याच तक्रारीच्या संबंधाने आपणाकडे मंत्री महोदय व आमदार यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रती मिळण्याबाबत. माहिती टपालाद्वारे उपलब्ध करुन घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ७.४.२००६ रोजी या कार्यालयास अधीक्षक, भूमी अभिलेख, बुलढाणा यांचे दिनांक ९.६.२००५ चे अहवालाची मागणी केलेली आहे. सदर माहितीचा मुख्य स्त्रोत अधीक्षक, भुमी अभिलेख, बुलढाणा या कार्यालयातील आहे. जरुर तर त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घेता येईल. तसेच मंत्री महोदय व आमदार यांनी तक्रारी संबंधाने कोणत्या दिनांकास केलेल्या कोणत्या पत्रव्यवहाराच्या प्रती आपण मागणी करीत आहात याचा स्पष्ट उल्लेख

नसल्याने पुरविता येत नाही, असे कळविण्यात आलेले दिसते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या द्वितीय अपीलाचा निर्णय दिनांक १८.५.२००६ रोजी दिलेला असून आपण माहितीच्या अधिकारात मागणी केलेली कागदपत्रे तयार आहे. शासकिय नकल फी चा भरणा करुन १५ दिवसात कागदपत्रे प्राप्त करुन घ्यावी अन्यथा आपला दिनांक २८.२.२००६ चा अपील अर्ज  इकडून निकाली टाकण्यात येईल यांची कृपया नोंद घ्यावी. सदरच्या उत्तराच्या अनुषंगाने दिनांक २४.५.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी आपण या माहितीसाठी मी किती रुपये नक्क ल फी भरावी याचा आपण सदरच्या पत्रात उल्लेख केलेला नाही. तसेच ही फी आपणाकडे प्रदान करावी किंवा मनी आर्डर पाठवावा किंवा शासकिय कोषागारात भरावी अथवा चालानची एक प्रत आपणाकडे पाठवावी अगर कसे याचा सुध्दा आपण दिलेल्या पत्रावरुन बोध होत नाही. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नमूना पत्र ब (पहा) (१२) मध्ये वेळ बाबतचा स्पष्ट उल्लेख आहे. तयार असलेल्या कागद पत्रांची नक्कल शुल्क किंती व कोठे भरावे याची यथाशिघ्र पत्राद्वारे माहिती कळविणेस विनंती आहे. जेणेकरुन १५ दिवसांत फी चा भरणा करता येईल असे कळविण्यात आलेले दिसते. त्याप्रमाणे दिनांक २६.५.२००६ रोजी माहिती करीता शासकिय फी रुपये ७०/- रजिस्टर पोस्ट खर्च रुपये ३५/- असे एकुण रुपये १०५/- शुल्कचा भरणा करावयाचा आहे, असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रुपये १०५/- चे मनी ऑर्डर पाठविलेले दिसून येते. परंतु त्यावर Refuse असा शेरा दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही अधीक्षक, भूमी अभिलेख, बुलढाणा यांचे कार्यालयाकडे उपलब्ध आहे असे दिनांक ७.४.२००६ च्या पत्रानुसार कळविण्यात आलेले असले तरी सदरचा अर्ज हा त्या कार्यालयाकडे हस्तांतरीत करावयास पाहिजे होता किंवा तसे हस्तांतरण करुन अपीलकर्ता यांना कळवावयास पाहिजे होते.

४. असे असले तरी अपीलकर्ता यांना अधीक्षक, भूमी अभिलेख, बुलढाणा यांचेकडे माहिती उपलब्ध आहे हे कळविल्यावर त्यांनी सुध्दा अधीक्षक, भूमी अभिलेख, बुलढाणा यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावयास पाहिजे होती. परंतु, तसे न करता त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयात मात्र माहिती उपलब्ध आहे व

नक्कल फी चा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविण्यात आल्याचे दिसून येते. त्याकरीता उत्तरवादी यांना विचारले असता त्यांनी असे सांगीतले की, त्या माहितीच्या बध्दलची प्रत त्यानंतर त्यांचे कार्यालयात उपलब्ध झाली व त्यामुळे त्यांना नक्कल फी भरावी असे कळविण्यात आले होते. मंत्री महोदय किंवा आमदार यांचेकडून आलेले पत्र हे निश्चित कोणत्या कार्यालयात आलेले होते व त्याबाबत आलेल्या पत्राची तारीख दिलेली नसल्यामुळे सदरची विचारलेली माहिती ही मोघम दिसून येते. त्याकरीता अर्जदारानी सुध्दा निश्चितपणे माहिती विचारल्यास त्यांना ती माहिती विहित मुदतीत मिळू शकते अन्यथा पत्रव्यवहारामध्येच वेळ जातो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ५.५.२००६ रोजीचे पत्रान्वये सुनावणी दिनांक १५.५.२००६ रोजी ठेवण्यात आलेली आहे असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु सदरचे पत्र मिळाले नाही किंवा अपीलकर्ता हे सुनावणीसाठी उपस्थित राहीले नाही असा उल्लेख दिनांक १८.५.२००६ च्या पत्रामध्ये दिसून येतो. नक्कल फी भरावी असे जेव्हा कळविण्यात येते तेव्हा ती निश्चितच प्रथम पत्रात कळविणे आवश्यक असते. अन्यथा पुन्हा पत्रव्यवहार वाढतो. यापुढे याबाबत दक्षता घेतली जाईल ही अपेक्षा आहे.

५. माहितीच्या अर्जाचे उत्तर देताना माहिती उपलब्ध करुन देताना सदरचे अर्ज नंतर निकाली काढता येत नाही तर त्या अर्जदारास त्या अर्जाच्या निर्णया विरुध्द प्रथम अपील कोणत्या अधिका-याकडे व किती दिवसात करावे हे कळविणे आवश्यक असते. तसेच प्रथम अपीलाची सुनावणी घेतल्या नंतर सुध्दा द्वितीय अपील किती दिवसात व कोणत्या प्राधिका-याकडे म्हणजे राज्य माहिती आयोगाकडे दाखल करावे असे कळवावे लागते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे कोणतेही अर्ज किंवा अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी किंवा माहिती अधिकारी यांना निकाली काढता येत नाही किंवा नस्तीबध्द करता येत नाही. अधिनियमाच्या अंमलबजावणीची सुरुवात असल्यामुळे ही बाब जरी असली तरी गांभीर्याने घेतली गेली पाहिजे याची नोंद घेण्यात यावी. मनी आर्डर स्विकारली नाही याबाबतचा खुलासा माहिती अधिकारी यांनी असा केलेला आहे की, मनी आर्डर हा कार्यालयात पोस्टमन यांनी ४ वाजल्यानंतर आणलेला होता व कॅश पेटी गेल्या नंतर मनी आर्डर स्विकारलेली नव्हती. दुस-या दिवशी मनी ऑर्डर आणण्यासाठी सांगीतले होते. परंतु पोस्टमन यांनी ती जमा केली असा खुलासा केलेला आहे. परंतु मनी ऑर्डरच्या संबंधात दाखल केलेल्या पावती वर Refuse शेरा दिलेला दिसून येतो.

६.	या एकुणच प्रकरणामध्ये माहिती ही ज्या कार्यालयात उपलब्ध आहे त्या कार्यालयात व निश्चित असा तपशिल देऊनच उपलब्ध करुन घ्यावयास पाहिजे होती. व त्यावेळेस अशा प्रकारे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ जरी केलेली दिसून येत नसली तरी सुध्दा माहिती ही उपलब्ध करुन घेण्यास विलंब झालेला दिसून येतो. व त्या करीता दोनही पक्ष हे जबाबदार असल्यामुळे त्याबाबतचा गांभिर्याने विचार केलेला नाही. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम. २००५ च्या तरतूदी प्रमाणे मुख्य उद्येश हा माहिती उपलब्ध करुन देणे हा असल्यामुळे सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व तशी माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी ही माहिती अधिकारी यांनी दाखविलेली आहे. परंतु, विलंब झालेला असल्यामुळे सदरची माहिती विना मुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

## आ दे श

१)	अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागीतलेली माहीती ही हा निर्णय मिळाल्या पासून ३ दिवसांचे आंत विना मुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२)	सदरची माहिती उपलब्ध करुन घेताना अपीलकर्ता यांनी माहिती मिळाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांना द्यावी.

३)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८५०/२००७**

१) श्री किशोर पंजाबराव खरबडे
रा. भाजी बाजार, पोस्ट ऑफिस
जुनी कोतवाली जवळ, अमरावती-४४४६०१ **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग,
औरंगाबाद, ता.जिल्हा औरंगाबाद.

३) जन माहिती अधिकारी तथा स्विय सहाय्यक
कारागृह उपमहानिरीक्षक मध्य विभाग, औरंगाबाद
ता.जिल्हा औरंगाबाद.

**उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हे हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा अर्ज आलेला असून त्यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.६.२००६ रोजी शासन निणय क्रं. /साप्रवि/इएमएस/१०९२/३६५५/सीआर-९०/९२/१६-अ दिनांक ३१ मे, १९९३ (२) शासन निर्णय क्रं. अकपा/१०९७/१७९३/प्र.क्र.-४/९८/१६-अ, दिनांक १८ मार्च, १९९८ (३) साप्रवि/शासन परिपत्रक क्रं.//एस.आर.व्ही./१०९७//प्र.क्रं.३१/९८/१६-अ दिनांक १६ मार्च, १९९९ व (४) महाराष्ट्र शासन गृह विभाग क्रं./एम आय एस-१००३/२०९५/प्र.क्रं.१०१/पोल-४, दिनांक २८.८.२००४ स्पिड पोस्टाने माहिती घेणार असे नमूद केलेले दिसून यते.

१. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी पथम अपील दिनांक १०.७.२००६ रोजी दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. व त्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२.	अपीलकर्ता यांचे माहितीच्या अर्जाचे संदर्भातील अर्ज कार्यालयात प्राप्त झालेला नाही असे माहिती अधिकारी यांनी सांगीतले. परंतु प्रथम अपील प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक ३१.७.२००६ रोजी चारही शासन निर्णयाच्या प्रती पुरविण्यात आलेल्या आहेत. व त्याकरीता त्यांनी जावक रजीस्टर नोंदवहीची छायाप्रत दाखल केलेली असून त्यामध्ये क्रमशः अ.क्रं. २८६८ या क्रमांकावर किशोर पी खरवडे, माहितीचा अधिकार जी.आर.प्रती रुपये ५/- अशा प्रकारची नोंद आढळून येते. व त्यावरुन सदरच्या प्रती या साध्या पोस्टाने पाठविलेल्या दिसून येतात. अपीलकर्ता यांचे अर्जात सुध्दा पोस्टाने असा उल्लेख आहे. त्यामुळे साध्या पोस्टोने पाठविलेले आहे, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. परंतु सदरच्या प्रती या अपीलकर्ता यांना मिळालेल्या नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

३.	अपीलकर्ता यांनी कागदपत्रे, प्रथम अपील अर्ज मिळाल्या नंतर विहित मुदतीत पाठविली असल्यामुळे त्याबाबतचा खुलासा राज्य माहिती आयोगाकडे करताना दिनांक ५.६.२००६ चा अर्ज मिळालेला नसल्यामुळे त्यांच्या त्या अर्जावर कार्यालयाकडून उत्तर देण्यात आलेले नाही असे म्हटले. तसेच अपीलकर्ता यांना पोस्टाने माहिती पाठविण्यात आलेली आहे. पुन्हा श्री किशोर खरबडे यांनी या कार्यालयास आतापर्यंत माहितीच्या अधिकारा अंतर्गत एकुण पाच अर्ज सादर केलेले आहेत. सदर अर्जानुसार या कार्यालयाकडून अर्जदारास वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. श्री खरबडे यांनी मागणी केलेल्या चार शासन निर्णयाच्या प्रती पुरविण्यात आलेल्या आहेत. तरीपण त्यांनी राज्य माहिती आयोगास अपीलीय अर्ज सादर केलेला आहे. या संबंधात माहिती अशाी आहे की, कारागृह विभागात मिश्रकाची पदे भरण्याकरीता लेखी परीक्षा मा. कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने दिनांक २७.७.२००५ ते २९.७.२००५ या कालावधीमध्ये कै. दौलतराव जाधव, तुरुंगाधिकारी, प्रशासकिय महाविद्यालय, येरवडा, पुणे-६ येथे घेण्यात आली होती. या परीक्षे मध्ये त्यांना १०० पैकी ४० गुण मिळाले होते. म्हणून त्यांना या परीक्षेत अनुत्तीर्ण घोषीत करुन त्यांना मौखिक परीक्षेकरीता बोलाविण्यात आलेले नाही म्हणून त्यांनी या कार्यालयास माहितीच्या अधिकाराखाली त्यांची निवड कां झाली नाही याबाबतची माहिती मागीतली असता त्यांना या कार्यालयाकडून माहिती देण्यात आली की, ते लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झाले म्हणून त्यांना पुढील प्रक्रियेकरीता अपात्र ठरविण्यात आलेले आहे. त्याकरीता त्यांनी या कार्यालयास

माहितीचे अधिकारा अंतर्गत वारंवार अर्ज सादर केलेले आहेत. व संबंधीत अर्जाचे उत्तर त्यांना वेळोवेळी देण्यात आलेले आहे. तसेच श्री खरबडे हे या कार्यालयामध्ये दिनांक २९.११.२००६ रोजी माहिती अधिकारा अंतर्गत प्रत्यक्ष अर्ज सादर करण्याकरीता स्वत: आले होते. त्यामुळे त्यांना शासन निर्णयाच्या प्रती मिळालेल्या नाही याबाबत समक्ष बोलाविणे आवश्यक होते परंतु त्यांनी तसेही केलेले नाही. अर्जदार हा मिश्रकाचे पदाकरीता झालेल्या लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेला आहे हे माहिती असुन सुध्दा त्यांनी या कार्यालयास वेळोवेळी अर्ज करुन या कार्यालयाचा तसेच मा. आयोगाचा विनाकारण वेळ वाया घलवित आहे व माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करीत असल्याचे दिसून येते. म्हणून मा. आयोगास विनंती करण्यात येते की, श्री खरबडे यांनी केलेली अपील फेटाळून दप्तरी दाखल करण्यात यावी, ही विनंती.

४. सदरच्या खुलाशा संदर्भात अपीलकर्ता यांनी दाखल केलेले दिनांक २.३.२००६ चे स्विय सहाय्यक तथा जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेले पत्रावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२००५ रोजी दिलेल्या मिश्रक पदाचे परीक्षेबाबत माहिती विचारलेली दिसून येते. व त्यावरुन दाखल केलेला खुलासा हा वस्तुस्थिती दर्शविणारा आहे असे दिसून येते. व त्या उत्तराच्या आदेशातच मागीतलेल्या शासन निर्णयाचा उल्लेख असल्यामुळे सदरच्या शासन निर्णयाची प्रत ही अपीलकर्ता यांनी मागीतलेली दिसून येते.

५. वास्तविक दाखल केलेले दस्तऐवज व माहिती अधिकारी यांचे उत्तर ही जरी वस्तुस्थिती असेल तरी वारंवार माहितीच्या अधिकारामध्ये अर्ज करुन माहिती उपलब्ध करुन देणे याचे काहीही कारण दिसत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती मागण्याचे कारण जरी विचारता येत नसले तरी प्रकरणातील वस्तुस्थिती लक्षात आल्यानंतर त्या हिताचा निश्चित विचार करावा लागतो. व त्यामुळे लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेले आहे हे माहिती असून सुध्दा ते या कार्यालयास वेळोवेळी अर्ज करुन माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करीत असलेले दिसून येते, या कारागृह उपमहानिरीक्षक यांच्या खुलाशात तथ्य दिसून येते.

६. अपीलकर्ता हे कारागृह उपमहानिरीक्षक यांचे कार्यालयात जातात असेही दिसून येते व ते त्यांनी मान्य केलेले आहे. व ज्या वेळेस दिनांक ५.६.२००६ च अर्जाबध्दल लेखी किंवा शासन निर्णयाची प्रत मिळाली नाही याबध्दलही लेखी तक्रार त्यांना २९.११.२००६ रोजी करता आली असती ती त्यांनी केलेली नाही.

७. असे असले तरी, जावक नोंदवहीच्या पुराव्या नुसार त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळटाळ केली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. त्यांना सदरच्या शासन निर्णयाची प्रत उपलब्ध झालेली नसेल तर आजही त्या शासन निर्णयाची प्रत त्यांना हवी वाटत असल्यास त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व तसे त्यांना विचारल्यावर त्यांनी त्या शासन निर्णयाच्या प्रतीची आवश्यकता आहे असेही त्यांनी मान्य केले आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना माहितीच्या अर्जामध्ये मागीतलेली शासन निर्णयाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व अपीलकर्ता यांनी त्याबाबतची पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १०.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये

**अपील क्रं. ८५१/२००७**

१) श्री मनोहर बाळकृष्ण धापोडकर,
रा. बंगालीपंजा, भोलेशहाबाबा दर्गाजवळ,
मस्कासाथ, नागपूर. **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

३) जन माहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
गिरीपेठ नागपूर. **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपील मेमो मध्ये ४ मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते. माहिती अधिका-याचा तपशिल हा शासकिय माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर असा दिलेला आहे. माहिती मागीतल्याच्या अर्जाची प्रत मात्र दाखल केलेली नाही. प्रथम अपील केलेले नाही. जो पत्रव्यवहार दाखल केलेला आहे तो दिनांक ३.११.२००६ चे उत्तर दाखल केलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ३०.९.२००६ चा अर्ज संचालक व माहिती अधिकारी, आदिवासी संधोधन व प्रशिक्षण संस्था, २८ क्वीन्स गार्डन, पुणे-१ यांचेकडे दाखल केलेला दिसून येतो. सदरच्या प्रकरणाच्या संबधामध्ये जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोग , नागपूर यांचेकडे अपील क्रमांक ५४/२००७ च्या निर्णयाची प्रत दाखल केलेली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी व निर्णय दिनांक ७.४.२००७ रोजी दिलेला आहे. सदरच्या निर्णयामध्ये दिनांक २.१.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केलेले होते. त्या अपीलाचा निर्णय झालेला दिसून येतो. मात्र माहिती मिळण्यासाठीचा जो अर्ज केलेला आहे तो दिनांक १८.८.२००६ असा केलेला आहे. व त्याच अर्जाच्या संबधामध्ये अपीलाचा निर्णय झालेला दिसून येतो. व त्यामध्ये अपीलकर्ता यांना माहिती मिळाली आहे या कारणास्तव अपील निकाली काढण्यात आलेले आहे. त्यामुळे पुन्हा तीच माहिती मिळण्यासाठीच्या

अर्जाच्या संबंधा मध्ये दाखल केलेल्या अतिरिक्त द्वितीय अपीलाची सुनावणी व निर्णय देणे हे संयुक्तिक होणार नसल्यामुळे  व एकाच अर्जाच्या संबंधामध्ये वेगवेगळे दोन अपील दाखल केलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१)	अपीलकर्ता यांचे दिनांक १८.८.२००६ च्या माहिती मिळण्याच्या अर्जाच्या संबंधात अपील क्रमांक ५४/२००७ चा निर्णय दिनांक ७.४.२००७ रोजी दिलेला असल्यामुळे व त्याच दिनांक १८.८.२००६ च्या माहिती मिळण्यासाठीच्या अर्जाच्या संबंधात पुन्हा सदरच्या दिनांक १६.१२.२००६ चे द्वितीय अपील दाखल केलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८५२/२००७**

१) कु. स्विटी किशोर भिसीकर
रा.प्लॉट नं. १४०४, न्यु. नंदनवन ले आऊट,
नागपूर. **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक (सं.), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
गिरीपेठ, नागपूर.

३) जन माहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
गिरीपेठ नागपूर. **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे महाराष्ट्र राईट टू इंन्फार्मेशन ऑर्डीनन्स च्या अन्वये कलम ११ (३) प्रमाणे प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहे.

२. सदरच्या प्रथम अपीलामध्ये आदेश मिळाल्याची तारीख १५.१.२००७ नमूद केलेली आहे. पुन्हा माहितीशी संबंधीत कार्यालय कमिश्नर, ट्रायबल व रिसर्च सेंटर असे दिलेले आहे. व त्यामुळे सकृत दर्शनीच सदरचे द्वितीय अपील खारीज करण्यास पात्र दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००६ रोजी महाराष्ट्र राईट टू इन्फार्मेशन रुल्स, २००२ च्या प्रमाणे कमिश्नर, ट्रायबल रिसर्च सेंटर यांचे कार्यालयात जी.आर.नंबर STC १३९९/letter No.२/१० Mantralaya Mumbai, dated ९.९.१९९९ ची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.१.२००७ रोजी सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळी (वेब साईट) उपलब्ध असून सदर शासन निर्णयाच्या वेब साईटचा क्रमांक GR २००२०४१७१२४३४३०००-२१०० असा आहे. तरी महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावा असे कळविलेले दिसून येते. तत्पुर्वी, दिनांक ८.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र राईट टू इन्फार्मेशन ऑर्डिनन्स, २००२ अंतर्गत सेक्शन ११(१) असा नमूना वापरुन प्रथम अपील श्री व्ही.एस.पाटील एवढयाच नांवावर पत्ता न देता

दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने ***दिनांक १५.१.२००७ रोजी दिनांक ९.१.२००७ च्या पत्राचा*** उल्लेख करुन माहिती कळविलेली आहे असे दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज दाखल करताना माहितीचा अधिकार अाि़नियम, २००५ च्या तरतूदींची कोणतीही दखल घेतली नाही. तसेच द्वितीय अपील दाखल करताना सुध्दा आयोगाचे नांव वापरलेले नसून प्रथम अपीलीय अधिकारी यांचे पदनाम वगैरे किंवा कार्यालयाचा पत्ता काहीही दिलेले नाही. द्वितीय अपील दाखल करताना सुध्दा विकास एस.पाटील, नागपूर ( लोकआयुक्त, महाराष्ट्र स्टेट) अशा प्रकारे संबोधून दाखल केलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांचा कोणताही अर्ज किंवा अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे नाही.

५. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा दिनांक १२.१०.२००५ रोजी अंमलात आलेला असून महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा दिनांक ११.१०.२००५ रोजी निरसित करण्यात आलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत कलम ४ प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयातील उपलब्ध असलेली माहिती ही संगणीकृत करावी किंवा वेब साईट वर उपलब्ध करुन द्यावी याकरीता दिनांक १५ जून २००५ ते १२.१०.२००५ पर्यंत कालावधी देण्यात आलेला होता. व त्याप्रमाणे ज्या ज्या सार्वजनिक प्राधिकरणाची माहिती ही प्रसिध्द करता येईल त्या प्रमाणे प्रसिध्द केलेली आहे. उद्येश असा आहे की, जी माहिती उपलब्ध आहे व प्रसिध्द केलेली आहे ती पुन्हा अर्ज करुन मागण्याचे कारण नाही. व तातडीने ज्यांना माहितीची आवश्यकता असेल त्यांना ती माहिती उपलब्ध व्हावी व त्याप्रमाणे सह आयुक्त तथा उपाध्यक्ष तथा शासकिय माहिती अधिकारी यांनी दिनांक ९.१.२००७ रोजी कळविलेले आहे ते अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे आहे व योग्य आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी वेब साईट वर सदरच्या शासन निर्णयाची माहिती उपलब्ध करुन घेणे अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे राहील.

६.. शासनाने सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयातील माहितीचे संगणकीकरण जरी केलेले असेल किंवा माहिती ही वेब साईट वर प्रसिध्द जरी केलेली असेल तरी सुध्दा अर्जदाराची मानसिकता ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयातून अभिलेखे किंवा दस्तऐवजाच्या स्वरुपात उपलब्ध करुन घेण्याची दिसून येते. व मागीतलेली माहिती ही वेब वाईटवर उपलब्ध आहे असे जरी कळविलेले असले तरी ती माहिती दस्तऐवज व कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध व्हावी अशी अपेक्षा असल्यामुळे प्रथम अपील व द्वितीय

अपील केले जातातच व अर्जदार त्या मार्गाने जावयास तयार नाही, याची शासनाने नोंद घ्यावी, हे सदरच्या प्रकरणावरुन दिसून येते.

७.. अपीलकर्ता यांनी माहिती दोन दिवस उशिरा दिली याबध्दल तक्रार केलेली आहे. त्याकरीता आधी अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणा मध्ये प्रत्येक स्तरावर माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत व ज्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये माहिती उपलब्ध आहे, त्या माहिती अधिका-याकडे अर्ज केल्यास निश्चितच मुदतीचा विचार केला जातो. व त्यामुळे कमिश्नर, ट्रायबल व रिसर्च सेंटर गिरीपेठ, नागपूर अशा प्रकारे अर्ज केल्यामुळे त्या अर्जाचा प्रवास त्या संबंधीत माहिती अधिका-यां पर्यंत जाण्याचा विचार करावा लागतो. एकदा का कायद्याच्या तरतूदीचा आधार घेतला असेल तर पुढील सर्व प्रक्रिया ही त्या कायद्याच्या तरतूदी प्रमाणेच तपासावी लागते व अपीलकर्ता यांना माहिती मिळाली असल्याने अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील  माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८५५/२००७**

१) श्री मधुकर हरिभाऊ कोडापे (शिपाई)
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन),
नागपूर विभाग, नागपूर.

३) जन माहिती अधिकारी तथा
अधीक्षक, सामान्य प्रशासन, आयुक्त कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर. **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.७.२००६ रोजी त्यांची बदली/सेवा संलग्न यामुळे झ ालेल्या अन्यायाची चौकशी व शहानिशा करुन न्याय मिळण्याबाबत दिनांक ३१.५.२००५ ला निवेदन देऊनही आजतागायत मला न्याय न मिळाल्यामुळे सोबत जोडलेल्या दोन प्रपत्रात क्रमांक १ ते १४ नुसार माहिती पुरविण्यात यावी. माहितीचा कालावधी २००४ ते २००६. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले असून दिलेल्या दोन प्रपत्रात खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते-

१) मी शासकिय कर्मचारी आहे. माहितीचा अधिकार २००५ नुसार मला माहितीच्या अधिकारातंर्गत माहिती मागण्याचा अधिकार आहे काय. असल्यास खालील माहिती क्रमांक १ ते १४ नुंसार पुरविण्यात यावी ही नम्र विनंती.

२) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रं.एस १४/९१/प्रक्र./८१८/ई ७, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २३ मार्च, १९९८ अजूनही माझे बदली/सेवासंलग्न संदर्भात शासनाचे नियमाचे उल्लंघन झाले नाही काय ?

३) मा.महाराष्ट्राचे राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. १६ जानेवारी, २००४ असूनही माझे बदली/सेवासंलग्न संदर्भात अध्यादेशाचे उल्लंघन झाले नाही काय ?

४) मुळ आस्थापना आयुक्त कार्यालयातील असूनही जिल्हाधिकारी कार्यालयात बदली करण्याचे कारण काय ?

५) वरिष्ठ कार्यालयातील कर्मचा-यांची कनिष्ठ कार्यालयात सेवा संलग्न करता येते काय.

६) जिल्हाधिकारी कार्यालयातील मुळ आस्थापनेचे चतुर्थ श्रेणी कर्मचारी आयुक्त कार्यालयात असूनही त्यांची बदली न करता माझी अगोदर बदली करणे व बदली रद्द करुन सेवा संलग्न करणे याचे कारण काय ?

७) जिल्हाधिकारी कार्यालयात केलेली बदली रद्द व्हावी करीता मा. आयुक्त साहेबांना निवेदन दिले असूनही दिनांक २९.६.२००४ चे नुसार नवीन पदस्थापनेचे ठिकाणी रुजू होण्याबाबत सक्तीचे आदेश देण्याचे कारण काय ?

८) श्री केशव दातारकर शिपाई हे जिल्हाधिकारी कार्यालयातील मुळ आस्थापनेवर असून त्यांची बदली जिल्हाधिकारी कार्यालयातील मुळ आस्थापनेवर करण्यात आली. दिनांक २५ जून २००४ नंतर त्यांची बदली रद्द करुन मा. आयुक्त कार्यालयात सामान्य शाखेत सामावून घेतले. परंतु मला सामावून न घेण्याचे कारण काय ?

९) माझी बदली करण्याचा दिनांक २५ जून २००४ २ महिन्यानंतर बदली रद्द करुन सेवा संलग्न करण्याचे कारण काय.

१०) जुलै, २००४ व ऑगष्ट, २००४ या २ महिन्याचे वेतन ८/९ महिन्याचे नंतर काढण्यात आले याचे कारण काय ?

११) माझी बदली केल्यामुळे माझ्यावर मानसिक त्रास/माझ्या कुटूंबातील आर्थिक परिस्थिती/बँकेतील थकती कर्ज असून व्याजाचा भुर्दंड/थकीत विद्युत बिल/मुलाचे शिक्षण /आईचे आजारपण/सहा महिने पगार नसल्यामुळे घरातील कुटूंबावर उपासमारी व माझे आर्थिक नुकसान याबाबत निवेदने देऊनही माझ्यावर अन्याय करण्याचे कारण काय ?

१२) मी आयुक्त कार्यातील मुळ आस्थ्ंापनेवरील कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालयात व जिल्हाधिकारी कार्यालयातील श्री बारापात्रे शिपाई हे आयुक्त कार्यालयातील विकास शाखेत सेवासंलग्न आहेत. याचे कारण काय ?

१३) माझे दिनांक ३१.५.२००५ चे मा. आयुक्तांना दिलेल्या निवेदनाचा आजपावेतो विचार करण्यात आलेला नाही. याचे कारण काय ?

१४) महाराष्ट्र शासनाने पदे कमी केल्यामुळे जिल्हाधिकारी आस्थापनेवरील चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना आयुक्त कार्यालयातून परत केले नंतर त्यांना मा. आयुक्तांच्या कार्यालयात सेवासंलग्न नुसार परत बोलाविले. त्यात माझा विचार कां करण्यात आला नाही. याचे कारण काय ?

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २६.७.२००६ रोजी जन माहिति अधिकारी यांनी १४ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या माहितीमुळे समाधान न झ ाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १६.१२.२००६ रोजी दिलेला असून प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संबंधातील दाखल केलेले असून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. तसेच अपील मुदबाहय आहे व त्या कारणा करीता खारीज केलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाच्या संबंधात ज्या १४ मुद्यांवर माहिती मागीतलेली आहे त्या १४ मुद्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सर्व मुद्ये अभिप्रायात्मक प्रश्न आहेत. सर्व प्रश्नांच्या माध्यमातून जन माहिती अधिका-यांचे त्यांच्या बदलीच्या/सेवा संलग्नतेच्या बध्दल अभिप्राय मागीतलेले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) प्रमाणे व (त्र) प्रमाणे "माहिती" व "माहितीचा अधिकार" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती ज्या "साहित्याच्या" स्वरुपात उदा. दस्तऐवज, अभिलेखे इ. स्वरुपात उपलब्ध असेल ती उपलब्ध करुन देणे होय. जन माहिती अधिकारी हे कोणत्याही प्रकारे कोणत्याही प्रकरणात त्या प्रकरणाच्या गुणवत्ते बाबत अभिमत व्यक्त करणारे सक्षम अधिकारी नाहीत. जन माहिती अधिकारी हा सार्वजनिक प्राधिकरणातील त्या त्या स्तरावरील असलेल्या माहितीचा तो परीरक्षक (custodion) असतो व त्यामुळे माहिती ही उपलब्ध करुन देताना अभिलेखे, दस्तऐवज, टिपण्या, परिपत्रके, शासन निर्णय इ.छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे एवढेच मर्यादित कर्तव्य हे माहिती अधिका-याचे आहे. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे गुणवत्तेच्या बाबत स्वतंत्रपणे योग्य त्या संबंधीत अधिका-यांकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेणे ही संकल्पना

आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातील जे १४ मुद्दे आहेत ते १४ मुद्यांचे संबंधात कोणत्याही प्रकारचा अभिप्राय किंवा अभिमत हे जन माहिती अधिकारी यांच्या कडून अपेक्षित नाही. परंतु, तरी सुध्दा जी माहिती दिनांक २६.७.२००६ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे ती योग्य आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही.

५. प्रथम अपीलाच्या संबंधात सुध्दा उपलब्ध झालेल्या माहितीच्या बध्दल विश्लेषण केलेले असल्यामुळे व प्रथम अपील हेच मुळात मुदतबाहय असल्यामुळे खारीज केलेले असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८६२/२००७**

१) श्री नवाब अब्दुल सत्तार फारुकी (लिपिक)
विभागीय कार्यशाळा महा.राज्य परिवहन कार्यालय,
इमामवाडा रोड, नागपूर. **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रादेशिक व्यवस्थापक (नागपूर प्रदेश)
महा.राज्य परिवहन कार्यालय, नागपूर.

३) जन माहिती अधिकारी तथा
विभाग नियंत्रक, महा.राज्य परिवहन नागपूर
गणेश टेकडी समोर, रेल्वे स्टेशन जवळ,
सिताबर्डी, नागपूर. **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली होती. परंतु, अपीलकर्ता यांनी " दिनांक १०.१.२००८ ला माहिती मिळालेली आहे" असे निवेदन दिलेले असून " आपण हया निवेदनाला अपील मागे घेण्याचा अर्ज समजावे व माझे द्वारा आपल्याकडे केलेली अपील खारीज करावे," असा विनंती अर्ज आयोगाकडे स्वतः हजर राहून दिलेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व त्यांनी तसे स्वतः लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १४ .१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८५७/२००७**

१) श्री माधव झिंगाजी कोहळे,
रा.विद्यानिकेतन कन्वेंट मागे, वार्ड नं.४,
मारेगांव, ता. मारेगांव, जिल्हा यवतमाळ-४४५३०३ **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
गडचिरोली.

३) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, देसाईगंज (वडसा),
ता. देसाईगंज (वडसा), जिल्हा गडचिरोली. **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

१. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.५.२००६ रोजी (दिनांक २५.२.२००६ अर्जावरील तारीख) अपीलकर्ता यांनी सांगीतल्याप्रमाणे माहिती मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता असे दिसून येते. सदरच्या अर्जामध्ये गोवारी जातीच्या विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र, कालावधी १९९५-०५ असून सन १९९५-०५ या कालावधीत आपल्या कार्यालयातून फक्त गोवारी, गोवारा किंवा गोंडगोवारी या जातीचे उमेदवारांना " विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र" निर्गमित केले अशा सर्वांचे नांवे व पत्ते इ. यादी पूरवावी ही विनंती. संबंधीत फी व पोस्टाचा खर्च कळवावा. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

२. सदरच्या अर्जाच्या प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे प्रथम अपील दाखल केले होते असे तोंडी अपीलकर्ता यांनी सांगीतले. परंतु, प्रथम अपीलाची प्रत दाखल केलेली

नाही. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील दाखल करावे लागते. व त्यामुळे सकृत दर्शनीच अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

३. वास्तविक, अपीलकर्ता यांना कोण कोणत्या प्रकारचे कागदपत्र दाखल करावयाचे आहे ही माहिती नोटीसद्वारे उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा सदरचे कागदपत्र सुनावणी सुरु होईपर्यंत अपीलकर्ता यांनी दाखल केलेले नाही. ( द्वितीय अपील निर्गमित झ ााल्यानंतर प्रथम अपील प्रती दाखल केल्या आहेत). असे असले तरी, माहिती उपलब्ध करुन देणे हा मुख्य उद्येश असल्यामुळे सदरच्या अपीलाची सुनावणी किंवा माहिती उपलब्ध झाली किंवा नाही याबध्दलची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांची असल्यामुळे त्यांना त्याबाबत विचारणा करण्यात आल्यावर माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही असे प्रथम दर्शनी दिसून येते. मात्र सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या करीता दिनांक ५.६.२००६ रोजी श्री सी.आर. तावाडे, कनिष्ठ लिपिक, आस्थापना यांना माहितीच्या अधिकरा अंतर्गत माहिती मागण्या करीताचा अर्ज, " श्री माधव झिंगाजी कोहळे यांनी संदर्भिय अर्ज सादर केला असून त्याची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे. त्यातील विचारणा करण्यात आलेल्या मुद्यांवर मुद्येनिहाय माहिती, जन माहिती अधिकारी यांना त्वरीत सादर करावी जेणेकरुन अर्जदारास उक्त माहिती मुदतीचे आंत पुरविणे शक्य होईल," असे कळविण्यात आलेले दिसून येते.

४. दिनांक २८.७.२००६ रोजी माहिती या कार्यालयात तयार करण्यात आलेली असून एकुण १० पृष्ठे आहेत. त्याकरीता रुपये २०/- एवढे शुल्क आहे. तसेच टपाल खर्च रुपये ३०/- असे एकुण रुपये ५०/- या कार्यालयात जमा करावे, असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ७.९.२००६ रोजी सुध्दा खर्चाची रक्कम रुपये ६८/- पाठविण्यात यावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्याच दिवशी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, असे माहिती अधिकारी यांनी त्यांच्या खुलाशा मध्ये दिलेले दिसून येते. दरम्यानचे कालावधी मध्ये प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.८.२००६ रोजी दिलेला असून अपीलकर्ता यांना माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नाही व त्याकरीता शास्ती लादण्याकरीता प्रथम अपील केल्याचे दिसून येते. प्रथम अपीलामध्ये विलंबासाठी शिक्षा देवून माहिती पुरविण्यास आदेश द्यावे अशी मागणी केलेली आहे. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये शास्ती लादण्याचे अधिकार हे प्रथम अपीलात नसल्यामुळे व राज्य माहिती

आयोगास असल्यामुळे त्या संबंधी या स्तरावर निर्णय घेता येत नाही. मात्र माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे आदेश करण्यात आलेले आहे.

५. अपीलकर्ता यांनी त्यांना माहिती कोणत्या तारखेला उपलब्ध झाली याबध्दलही खुलासा किंवा काहीही दाखल केलेले नाही. मात्र, माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वडसा (देसाईगंज) यांनी दिनांक ७.९.२००६ रोजी माहिती उपलब्ध झालेली आहे, माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असे खुलाशावरुन दिसते. परंतु, जून महिन्यामध्ये शालान्त परीक्षांचे निकाल जाहिर झाल्यामुळे जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र देण्याचे काम जास्त प्रमाणात असल्यामुळे व सदर माहिती सुध्दा त्याच लिपिकाकडे असल्यामुळे माहितीस विलंब झालेला आहे, असा खुलासा केलेला आहे. सदर कालावधीत रजेवर असल्यामुळे व शालान्त परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यामुळे व विद्यार्थ्यांचे अधिवास व जातीचे प्रमाणपत्र फार जास्त प्रमाणात देण्यात आल्यामुळे व या दोन महिन्यांचे कालावधीत १८९३ जातीचे दाखले व सरासरी अधिवासचे २०० प्रमाणपत्र देण्यात आले आहे. व त्याच लिपिकाकडे हे काम असल्यामुळे, व माहिती फार मोठी व किचकट असल्यामुळे माहितीस विलंब झालेला आहे असा खुलासा सादर करण्यात आलेला आहे.

६. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे माहिती मागीतल्या नंतर ३० दिवसांत उपलब्ध करुन द्यावी असे कलम ७(१) मध्ये नमूद आहे. परंतु माहितीचा अर्ज आल्यानंतर माहितीचे स्वरुप जर तपासण्यात आले तर त्याप्रमाणे त्या माहितीच्या संबंधामध्ये कार्यवाही करताना अपीलकर्ता यांना काय कार्यवाही केली जात आहे हे कळविणे आवश्यक असते. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागीतलेली आहे ती सन १९९५-२००५ पर्यंतच्या कालावधीची असल्यामुळे निश्चितच जूनी व व्यापक प्रमाणात माहितीचे स्वरुप आहे. माहिती मागीतल्या नंतर माहिती मागण्याचे कारण जरी विचारता येत नसले तरी सार्वजनिक व्यापक हित किती आहे याचाही त्यामध्ये विचार करावा लागतो. व त्यानंतरच सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करता अपीलकर्ता अर्जदार यांस कळविणे आवश्यक ठरते. माहिती उपलब्ध करुन देण्याच्या करीता दिनांक ५.६.२००६ रोजी लिपिक श्री तावाडे यांना पत्र दिलेले दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केली किंवा माहिती उपलब्ध करुन देण्याचे नाकारले असा निष्कर्ष काढता येत नाही. मात्र त्या पत्राची प्रत ही अपीलकर्ता यांना द्यावयास पाहिजे होती. आता जो खुलासा या आयोगाकडे करण्यात आलेला आहे तो खुलासा हा अपीलकर्ता यांना

त्यावेळेस द्यावयास पाहिजे होता. व त्यामुळे माहिती ही विलंबाने उपलब्ध झालेली असल्यामुळे प्रथम दर्शनी माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. परंतु, अधिनियमाच्या कलम ५ (४) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या करीता लिपिकाचे सहाय्य घेतले असल्यामुळे अधिनियमाच्या कलम ५(५) प्रमाणे लिपिक हे सुध्दा माहिती अधिकारी होऊ शकतात. व लिपिक श्री तावाडे हे त्याबाबत दोषी आढळून येत आहे. व त्यामुळे लिपिक यांचेवर कलम २० (२) प्रमाणे शास्ती लादणे हे संयुक्तिक राहील. मात्र अपीलकर्ता यांनी सुध्दा ज्या घटनाक्रमाने पत्रव्यवहार किंवा माहिती उपलब्ध झाली असेल त्या बध्दलची माहिती आयोगास द्यावयांस पाहिजे. परंतु, सदरच्या सुनावणीच्या वेळेस सुध्दा अपीलकर्ता यांनी अपूर्ण माहिती दिलेली असल्यामुळे व कागदपत्रे दाखल केलेली नसल्यामुळे सदरच्या शास्तीचा गंभिरपणे विचार करता येणार नाही. ( निर्णय झाल्यानंतर मात्र अपीलकर्ता यांनी कागदपत्रे दाखल केले असे कार्यालयातून सांगण्यात आले ).

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत असून कनिष्ठ लिपिक श्री तावाडे यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना पुढील कार्यवाहीसाठी पोस्टोने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १४ .१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८६०/२००७**

१) श्री विलास जैराम तांबे,
रा. १५, पी.एच.डी. होस्टेल
डॅा.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठ परिसर, अकोला
ता.जिल्हा अकोला -४४४१०४. **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलसचिव,
डॅा.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला,
कृषिनगर, अकोला, ता.जि. अकोला.

३) जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (आस्थापना)
डॅा.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला,
कृषिनगर, अकोला, ता.जि. अकोला. **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२००६ रोजी No.BBA/Prom/ENTO/२००५, dated १२.९.२००५ नुसार झालेली पदोन्नती ही मेरीट व गुणवत्ता डावलून दिली असल्यामुळे व सहयोगी प्राध्यापक (किटकशास्त्र) च्या पदोन्नतीस न्यायालयात चुनौती देण्यासाठी promotion order नुसार १) Adov. general यांचे opinion (२) Recommendation of the Selection Committee (३) Government letter & its enclosure as it is prescribe in the order चे प्रत सहित माहिती पाठविण्याबाबत. सदरची माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १८.५.२००६ रोजी अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १.२.३ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (डी) (जी) व (जे) मधील तरतूदी नुसार निवड समितीचे कार्यवृत्ताची प्रत देता येणार नाही असे कळविण्यात

आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने अपीलार्थीचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ११.०६.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या मेमो मध्ये माहितीचा अधिकार अधिनियमाचे कलम ८ (ड) (जी) व (जे) च्या तरतूदी नुसार नाकार दिला वास्तविक ते कलम माझ्या विषयाच्या संबंधात नाही व माझे गोपनिय अभिलेख चांगले असून पदोन्नतीसाठी लागणारे संशोधन, शिक्षण व विस्तार कार्याचा सुध्दा अनुभव सरस आहे. तरी कृपया आपण याबाबत अधिक चौकशी करुन मला किटकशास्त्र विषयाचे सहयोगी प्राध्यापकाची पदोन्नतीच्या निवड समितीचे कार्यवृत्ताची प्रत पुरविण्यात यावी व पदोन्नतीत मला न्याय मिळवून द्यावा ही नम्र विनंती, असे नमूद केलेले दिसून येते.

४. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १९ जून, २००६ रोजी आपण उपस्थित केलेल्या मुद्यांवर चर्चा करण्यासाठी कुलसचिव, तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे समक्ष दिनांक २३.६.२००६ रोजी दुपारी १२.०० वाजता हजर राहावे असे कळविण्यात आलेले दिसते. व दिनांक १०.१०.२००६ च्या पत्रानुसार अपीला मध्ये मागीतलेली निवड समितीच्या कार्यवृत्ताची प्रत अर्जदारास पाठविण्यात आलेली आहे असे दिनांक १०.१०.२००६ च्या पत्रावरुन दिसून येते.

५. वरील सर्व प्रकरणावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागीतलेली संपुर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु निवड समितीच्या कार्यवृत्ताची माहिती त्यांना विहित मुदतीत उपलब्ध झालेली नव्हती व त्यामुळे त्यांनी प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

६. जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (डी) (जी) व (जे) चे प्रकरणामधील तरतूदी नुसार निवड समितीच्या कार्यवृत्ताची प्रत देता येणार नाही असे जे कळविले होते हे त्यांचे अभिमत होते व त्यामुळे सदरचे अभिमत हे त्यांनी सद्भावनेने दिले होते हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केली होती असा निष्कर्ष काढता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलमाच्या तरतूदी प्रमाणे कोणती माहिती प्रगट करता येत नाही त्याबध्दलचे अपवाद हे कलम ८ मध्ये देण्यात आलेले आहेत. व माहितीचा अर्ज मिळाल्यानंतर अधिनियमाच्या कलमामधील तरतूदी प्रमाणे माहितीची छाननी करुन त्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याविषयीची कार्यपध्दती आहे व तसेच आतापर्यंत निवड

प्रक्रियेची माहिती ही गोपनिय माहिती आहे अशा प्रकारचा समज असल्यामुळे त्याप्रमाणे उत्तर दिलेले दिसून येते. कोणत्याही प्रकरणातील निर्णय प्रक्रिया सुरु असताना माहिती उपलब्ध करुन देणे हे कलम ८ मधील अपवादामध्ये येऊ शकते. परंतु निर्णय प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर व त्या निर्णय प्रक्रियेचा निर्णय बाहेर आल्यानंतर त्या निर्णय प्रक्रियेला कोणत्याही प्रकारे गोपनियता ठेवता येणार नाही. व प्रक्रियेमधील अभिलेख्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करणे आवश्यक ठरेल. त्याशिवाय निर्णय प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येणार नाही. व माहितीचा अधिकार याचा उद्येशच प्रशासनामध्ये पारदर्शकता आणणे आहे. व त्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर अपीलकर्ता यांना निवड समितीच्या कार्यवृताची प्रत विलंबाने कां होईना पण उपलब्ध करुन दिली हा निर्णय योग्य आहे. यावरुन अपीलकर्ता यांना ही माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना दिनांक १७.५.२००६ च्या अर्जाप्रमाणे मागीतलेली माहिती ही उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १४ .१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**-अपील क्रं. ८६४/२००७**

१) श्री आबाराव शंकर धोरण
मु.पो.मलकापूर, गोविंदनगर, बीर्ला रोड,
ता. मलकापूर, जिल्हा बुलढाणा. **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक, ता.जि. बुलढाणा.

३) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
बुलढाणा. ता.जिल्हा बुलढाणा. **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर असून प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयातून कागदपत्रे दाखल केलेले आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.६.२००६ व दिनांक १०.६.२००६ रोजी माहिती मिळण्यासाठी दोन अर्ज दाखल केलेले दिसून येते. सदरच्या दोन अर्जाच्या संबंधामध्ये दिनांक २४.७.२००६ रोजी ७ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येतात. परंतु, मुद्या क्रमांक ५ मध्ये दिनांक १५.५.२००४ चे सिआर/१५ छाननी अहवाल/०४-५४० चे पत्र आपणास देता येणार नाही असे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.७.२००६ व दिनांक २७.७.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७.९.२००६ रोजी देण्यात आलेला असून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ शासन परिपत्रक क्रमांक ममाअ-२००४/प्र.क्र.१३५/०४/०५ मंत्रालय, मुंबई, दिनांक १६.१०.२००४ मधील मुद्या क्रमांक ४ नुसार, " शासनाच्या परस्पर संबंधाखाली सरकारी वकीलांनी सल्ला दिला असेल तर अशी माहिती देता येणार नाही. सदर माहिती दिल्यास संबंधीत प्रकरणात शासनाच्या बाजूवर विपरित परिणाम होण्याची शक्यता असेल तर ती माहिती पुरविण्याचे

नाकारण्यात यावे " असे स्पष्ट नमूद केलेले आहे. वरुन उपविभागीय पोलीस अधिकारी, मलकापूर यांनी त्यांचे वर नमूद पत्रात सरकारी अभियोक्ता यांचे कळविलेल्या अभिप्रायाशी व त्यानुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी मलकापूर यांनी कार्यवाहीशी आम्ही सहमत आहो. या निर्णयाची माहिती अपीलार्थी यांस कळविण्यात यावी. प्रकरण अंतिमत: निकाली काढण्यात आलेले आहे. खर्चाच्या बाबत कोणत्याही प्रकारचे आदेश नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. व सदरच्या निर्णयाचे विरुध्द सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२००४ चे सिआर/१५ छाननी अहवाल/०४-५४० चे पत्र व सरकारी अभियोक्ता यांचे पत्राची प्रत मिळाली नाही, या कारणाकरीता द्वितीय अपील दाखल केलेले आहे. त्याबाबतचा खुलासा करताना जन माहिति अधिकारी यांनी असा खुलासा केलेला आहे की, प्रभारी सहाय्यक संचालक तथा सरकारी अभियोक्ता, बुलढाणा यांचेकडील पत्र क्रमांक प्र.क्रं.सं.सं.व सं/अभि/बुल/अभिप्राय/०६-२९८, दिनांक ११.७.२००६ अन्वये माहितीचा अधिकार सन २००५ चे कायदया प्रमाणे सरकारी अभियोक्यांनी दिलेल्या अभिमताची प्रत इतरांना देण्यात येत नाही, तरी त्यांना प्रत देणे संयुक्तिक होणार नाही, असे अभिप्राय सादर केलेले असल्यामुळे सदरच्या अभिप्रायाची प्रत ही अर्जदार यांना देण्यात आलेली नाही. यावरुन जो निर्णय माहिती अधिकारी यांनी दिलेला आहे तो सद्भावनेने दिलेला दिसून येतो. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याचे टाळाटाळ केले आहे असे म्हणता येत नाही. परंतु सरकारी अभियोक्त्यांचे अभिमत हे उपलब्ध करुन देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये अभिप्रेत आहे. अधिनियमाचे कलम ८ प्रमाणे माहिती प्रगट करण्यास अपवाद दिलेले आहे. त्यामध्ये पोटकलम (ज) प्रमाणे ज्यामुळे अपराध्याचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियेमध्ये अडथळा येईल अशी माहिती प्रगट करण्यास अपवाद करण्यात आलेला आहे. व त्यामुळे एखाद्या प्रकरणामध्ये कायदेशिर मत सरकारी अभियोक्याचे घेतलेले असेल व त्याप्रमाणे तपास प्रक्रिया सुरु असेल व खटला दाखल झ ाालेला नसेल अशा वेळेस सदरच्या अभिमताची प्रत ही उपलब्ध करुन दिल्यास तपास कामामध्ये किंवा खटला दाखल करण्याच्या कामामध्ये अडथळा येवू शकतो व त्यामुळे सदरची माहिती ही प्रकट करण्यासाठी अपवाद केलेला आहे. त्यानुषंगाने तपास प्रक्रिया सुरु

असेपर्यंत, त्या तपास प्रक्रियेतील कोणतेही कागद पत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तीक असणार नाही. मात्र, तपास प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर त्या तपास प्रक्रियेतील अभिलेखे, दस्तऐवजाच्या छायांकित प्रती हया उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारचा अपवाद असण्याची गरज नाही.

४. ज्यावेळेस जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या अभिमताच्या प्रक्रिया संबंधामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याचे नाकारलेले आहे व प्रथम अपीलात सुध्दा सदरचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला आहे त्यावेळेस तपास प्रक्रिया सुरु होती व त्यामुळे माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य दिसून येतो. मात्र आज हया अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस सदरच्या गुन्हयाची तपास प्रक्रिया संपलेली असेल किंवा खटला न्यायालयात दाखल झालेला असेल तर सदरच्या अभिमताची छायांकित प्रत उपलब्ध असल्यास उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारचा अपवाद असु नये. त्याप्रमाणे सदरच्या प्रकरणात गुन्हयाची चौकशी पुर्ण झालेली असल्यास व न्यायालयात आरोप पत्र दाखल झालेले असल्यास अपीलकर्ता यांनी मागीतलेल्या सरकारी अभियोक्त्यांच्या अभिमताची प्रत उपलब्ध असल्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

. **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांचे माहितीचे अर्जामधील मुद्या क्रं. ५ च्या संबंधात दिनांक १५.५.२००४ चे सीआर-१५/छाननी अहवाल/०४-५४० चे सरकारी अभियोक्ता, बुलढाणा यांचे शिफारस पत्राचा अहवाल सदरच्या प्रकरणामध्ये गुन्हयाची चौकशी सुरु असल्याने उपलब्ध करुन न देण्याचा त्यावेळचा निर्णय योग्य होता. परंतु आता गुन्हयाची चौकशी पुर्ण झालेली असल्यास व न्यायालयात आरोप पत्र दाखल झालेले असल्यास शिफारस पत्राच्या अहवालाची प्रत उपलब्ध असल्यास हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जामध्ये व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घेणार असे नमूद केले असल्यामुळे सदरची माहिती अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

दिनांक १५.१.२००८

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**
**अपील क्रं. ८६८/२००७**

१) श्री अब्दुल वहाब हाजी अ. रहेमान
रा.वार्ड क्रं.३, मोमीनपुरा, देऊळघाट,
ता.जिल्हा बुलढाणा. **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यपालन अधिकारी,
जिल्हा परिषद, बुलढाणा.

३) जन माहिती अधिकारी तथा
पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद,
बुलढाणा. **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२००६ रोजी " अदर स्टेट साठी २ टक्के राखीव जागा (महाराष्ट्र) गव्हर्नमेंट नोकरीसाठी जी.आर. देण्यात यावा. अदर स्टेट पशुशिक्षण जागा एज्युकेशन महाराष्ट्र, माझा मुलगा नांवे म. जावेद अ. वाहाब यांनी मध्य प्रदेश येथील (वेटरनरी कोर्स) गव्हर्नमेंट मान्यता असून मला महाराष्ट शासन २ टक्के नोकरीसाठी महाराष्ट्र शासन जी.आर. देण्यात यावा. सदरची माहिती टपालाद्वारे नोंदणीकृत घेण्यात येणार. याबध्दल काहीही माहिती दिलेली नाही." सदरच्या माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.४.२००६ रोजी " अदर स्टेट साठी २ टक्के राखीव जागा (महाराष्ट्र गव्हर्नमेंट) काढलेल्या नोकरीसाठीचा जी.आर. आपण ज्या महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयाची मागणी केली आहे, त्यानुसार आपणास हव्या असलेल्या शासन निर्णयाचा मंत्रालयीन विभाग, शासन निर्णय क्रमांक व दिनांक याचा उल्लेख आपल्या अर्जात केलेला नसल्यामुळे आपण मागणी केलेले शासन निर्णय शोधणे कठीण जात आहे. तरी आपण वर नमूद केलेल्या बाबी या कार्यालयास अर्जामार्फत कळविल्या तर आपणास हवा असलेला शासन निर्णय शोधण्यास सोपे जाईल. तरी सुध्दा आपण मागणी

केलेला शासन निर्णय शोधण्याची कार्यवाही कार्यालयात सुरु असून शासन निर्णय प्राप्त होताच आपणास आपल्या पत्यावर पाठविण्यात येईल " असे कळविण्यात आल्याचे दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २८.६.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत असून सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय मात्र देण्यात आलेला दिसत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

४. प्रथम अपीलाचा निर्णय कां देण्यात आला नाही असे विचारले असता, अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्यामुळे व माहितीचे वर्णन निश्चित नसल्यामुळे व त्याबाबतचा खुलासा दिनांक १८.४.२००६ रोजी अपीलकर्ता यांना विचारलेला असल्यामुळे व त्यानंतर अपीलकर्ता यांना खुलासा विचारल्यानंतर सुध्दा खुलासा उपलब्ध करुन दिलेला नसल्यामुळे सदरचे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे सांगण्यात आले.

५. अपीलकर्ता यांच्या माहिती मिळण्यासाठीच्या अर्जातील माहितीच्या वर्णनाचे अवलोकन केले असता एक निश्चित दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही मोघम व निश्चित वर्णनाची नाही. सार्वजनिक प्राधिकरणातील कोणतीही माहिती ही अभिलेखे, दस्तऐवज टिप्पणी, परपित्रके, शासन निर्णय नियमांच्या प्रती इ. छायांकित प्रतीच्या स्वरुपात मागता येते पण त्याकरीता त्या कागदपत्रांचे निश्चित वर्णन करणे आवश्यक असते. शासन निर्णयाची प्रत ही उपलब्ध करुन द्यावयाची असेल तर त्या शासन निर्णयाचा मंत्रालयीन विभाग, क्रमांक व तारीख हे उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. कारण शासनाच्या सर्व मंत्रालयीन विभागामध्ये प्रत्येक दिवसाला अनेक शासन निर्णय नव्हे एकाच विभागात निरनिराळया कक्षात अनेक शासन निर्णय हे निर्गमित केले जातात. व त्यामुळे निश्चित असे माहितीचे वर्णन असल्याशिवाय फक्त विषयावरुन उपलब्ध करुन देण्याबध्दल जे उत्तर जन माहिती

अधिकारी यांनी दिलेले आहे ते उत्तर योग्य आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८.४.२००६ रोजी दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे व त्यानंतर सुध्दा निश्चित असे माहितीचे वर्णन किंवा शासन निर्णयाची विभाग क्रमांक व तारीख ही माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरचे द्वितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

२ अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८६९/२००७**

१) श्री अशोकराव चेंडसा शहाडे,
रा.उदय कॅालनी नं.१, साईनगर,
अमरावती. ता.जि. अमरावती-४४४६०७. **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे विभाग,
यवतमाळ.

३) जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, बेंबळा प्रकल्प विभाग, यवतमाळ,
ता.जि. यवतमाळ. **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००६ रोजी श्री भानुदास लक्ष्मणराव देऊळकर यांचा मौजा बेलोरा गट क्रं. ३०/१, तालुका नांदगांव, जिल्हा अमरावती येथील बुडीत क्षेत्रात गेल्याची माहिती, कालावधी ४/५ वर्षचा, क्षेत्र व देण्यात आलेली रक्कम, बुडीत क्षेत्रात गेलेला संत्रा संख्या व रक्कम, बुडीत क्षेत्रात गेलेल्या विहिरी व रक्कम. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.६.२००६ रोजी उप कार्यकारी अभियंता, बेंबडा प्रकल्प, यवतमाळ यांनी " संदर्भिय अर्जान्वये आपण बेलोरा येथील श्री भानुदास लक्ष्मणराव देऊळकर यांचे नांवे असलेला गट क्रं. ३०/१ मधील बुडीत क्षेत्रात गेलेल्या फळझाडे व विहिरी इ.चे नुकसान भरपाई बाबत माहिती मागीतलेली आहे. सदर माहिती भूअर्जन अधिकारी यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे आपण सदर प्रकरणी विशेष भूअर्जन अधिकारी, अप्पर वर्धा प्रकल्प क्रमांक ४, अमरावती यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. सोबत आपण पाठविलेला सर्वे नंबर ३० चा डी.डी.क्रमांक ०४८०६०, दिनांक ७.४.२००६ हा परत

पाठविण्यात येत आहे " असे कळविण्यात आल्याचे दिसून येते. सदरच्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.७.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २२.९.२००६ रोजी अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, यवतमाळ यांनी बेंबडा प्रकल्प विभाग, यवतमाळ यांनी दिलेली माहिती बरोबर असल्याचे निदर्शनास येते. " संयुक्त मोजणी मामला क्रमांक १/४७/९९-२००० या प्रकरणातील निवाडा तक्ता - इ व संयुक्त मोजणीच्या प्रती या पत्राद्वारे आपणास पाठविण्यात येत आहे " असे कळविल्याचे दिसून येते. मात्र सदरच्या पत्रासोबत संयुक्त मोजणीची प्रत व निवडा प्रतीतील तक्ता इ. जोडल्याचे नमूद केले होते, परंतु प्रत्यक्ष जोडून पाठविलेले नाही. तरी त्वरीत पाठवून देण्याची व्यवस्था करावी असे दिनांक १८.१०.२००६ ला कळविण्यात आल्याचे दिसून येते. पहिल्या अपीलाचे उत्तर मिळाले नाही. माहिती अधिका-यांकडून माहिती मिळाली नाही व त्यामुळे सदरचे द्वितीय अपील दाखल केले आहे असे द्वितीय अपीलात नमूद केलेले दिसून येते.

४. वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जामध्ये श्री भानुदास लक्ष्मणराव देऊळकर यांचा मौजा बेलोरा येथील गट क्रमांक ३०/१ बध्दलचे बुडीत क्षेत्रात गेल्याची माहिती मागीतलेली आहे. व त्याबाबत माहिती उपलब्ध करुन देताना मात्र क्षेत्र हे त्यांनी कळविलेले दिसून येत नाही. वास्तविक माहिती अधिकारी यांना विचारले असता क्षेत्र उपलब्ध असतात असे त्यांनी तोंडी मान्य केले व त्यामुळेच प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये संयुक्त मोजणी मामला निवाडा प्रतीतील तक्ता-इ व संयुक्त मोजणीची प्रत पाठविल्याचे असे त्यांचे म्हणणे असले तरी अपीलकर्ता यांना ते मिळालेली नाही हे त्यांचे दिनांक १८.१०.२००६ च्या पत्रावरुन व त्यांनी दाखविलेल्या लिफाप्याच्या आकारावरुन निष्कर्ष काढता येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरच्या संयुक्त मोजणीचा मामला गट क्रं. १/४७/९९-२००० या प्रकरणातील निवाडा प्रतीतील तक्ता - इ व संयुक्त मोजणीची छायांकित प्रत हया प्रमाणित करुन विनामूल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांचेकडे क्षेत्र माहिती उपलब्ध असताना सुध्दा दिनांक १५.६.२००६ च्या पत्रामध्ये ते कळविलेले नसल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यामुळे अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे त्यांच्या विरुध्द शास्ती लादणे संयुक्तिक राहील.

.

## <u>आ दे श</u>

१)	अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना संयुक्त मोजणी मामला क्रमांक १/४७/९९-२००० या प्रकरणातील निवाडा प्रतीतील तक्ता - इ व संयुक्त मोजणीच्या छायांकित प्रती हया प्रमाणित करुन हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्या.

२)	दिनांक १५.६.२००६ रोजी जे संबंधीत जन माहिती अधिकारी असतील त्यांनी अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे त्यांचे विरुध्द विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची विभागीय चौकशी ही मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांनी करावयाची असून हा निर्णय मिळाल्यापासून ३ महिन्यांचे आंत तसा अहवाल आयोगाकडे पाठविण्यात यावा.

३)	सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

४)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं.८७४ /२००७**

१) श्री प्रा.डॉ. धर्मेंद्र पुर्णाजी तेलगोटे
रा.ग्रीन पार्क, के.ई.एस.हायस्कुल जवळ,
पांढरकवडा, ता. पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ
यवतमाळ- ४४५३०२. **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक (उच्च शिक्षण ),
अमरावती विभाग, अमरावती.

३) जन माहिती अधिकारी तथा
सहसंचालक (उच्च शिक्षण ),
अमरावती विभाग, अमरावती **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००६ रोजी प्राध्यापकांच्या वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी संबंधात महाराष्ट्र शासन स्तरावरुन निवड समितीने ठरविल्याप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर सहसंचालक (उच्च शिक्षण ), अमरावती स्तरावर होणारी कार्यवाही बाबत माहिती. माहितीचा कालावधी -प्राचार्य लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी यांचेकडून वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी संदर्भात १ सप्टेंबर, २००५ ते २८ फेब्रुवारी, २००६ पर्यंत प्राप्त प्रस्ताव, आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन- अ) क्रं. ३ मधील मुद्या क्रमांक १ च्या अनुषंगाने १ जानेवारी, २००५ ते १ जानेवारी २००६ पर्यंत असलेले शासन निर्णय, आदेश व प्रस्ताव यांच्या प्रती. ब) माहिती संबंधीत कालावधीत किती प्रस्ताव प्राप्त झाले क) त्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही झाली. झाली नसल्यास त्या विलंबाची कारणे काय आहे ड) झालेली कार्यवाही/शासन निर्णय/प्रस्ताव/आदेश उल्लंघन करणारी आहे काय. असल्यास/नसल्यास त्याची कारणे. सदरची माहिती व्यक्तीशः हवी आहे असे नमूद केले आहे. सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नसल्यामुळे

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२०००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलामध्ये दिनांक १६.३.२००६ चा अर्ज २१.३.२००६ रोजी सहसंचालक यांचे कार्यालयात स्वहस्ते पोहचविला व त्याची पोच घेतली. प्रस्ताव प्रकरणात कोणत्याही प्रकारची माहिती किंवा आदेश अपीलकर्त्यांस न मिळाल्यामुळे आदेशाच्या दिनांकाचा उल्लेख करण्याचा प्रश्न उदभवत नाही असे नमुद केले व पुन्हा माहितीचा तपशिल दिलेला आहे.

३. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ९.६.२००६ रोजी ३ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरची माहिती ही अपूर्ण व त्रुटी असलेली आहे, असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. मुद्या क्रमांक १ मध्ये प्रस्ताव तपासणी करुन निकाली काढण्याचा कालावधी दिलेला नाही. त्याचप्रमाणे मुद्या क्रमांक २ मध्ये (३) मध्ये प्राप्त झालेले प्रस्ताव निकाली काढण्यात आलेले आहे. ही माहिती दिनांक ९.६.२००६ ची आहे व त्यांना माहिती दिनांक २१.३.२००६ रोजी प्रस्तावाची सद्यस्थिती काय होती त्याबध्दलची माहिती त्यांनी मागीतलेली/हवी आहे असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपीलकर्ता यांचा दिनांक २१.३.२००६ च्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही हे माहिती अधिकारी यांनी सुध्दा मान्य केले आहे. परंतु, त्या कालावधीत माहिती संकलीत करीत होते, असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, माहिती जरी संकलीत करीत होते तरी त्याबध्दल अपीलकर्ता यांना मात्र त्याबध्दल कळविलेले दिसून येत नाही. त्यामुळे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही.

५. त्यानंतर प्रथम अपीलाच्या संदर्भात माहिती दिनांक ९.६.२००६ रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही. प्रथम अपील दाखल झाल्यानंतर नैसर्गिक न्यायाच्या तत्वाप्रमाणे अपीलकर्ता व माहिती अधिकारी यांच्या उपस्थितीत सुनावणी घेणे व कारण मिमांसा देणारा निर्णय देणे हे अपेक्षित आहे. प्रशासकिय आदेशाप्रमाणे आदेश काढून अपीलकर्ता

यांना कळविणे हे अपेक्षित नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जे प्रशासकिय आदेशाचे स्वरुपात पत्र रुपाने कळविले आहे ते सुध्दा अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन करणारे आहे.

६. असे असले तरी अपीलकर्ता यांना दिनांक २१.३.२००६ च्या अर्जाप्रमाणे त्या दिवशी त्यांना मागीतलेल्या माहितीची किंवा प्रस्तावाची सद्यस्थिती काय होती याबध्दलची माहिती उपलब्ध झाल्यास त्यांचे समाधान होईल असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे त्यांचे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून दिनांक ९.६.२००६ रोजी जरी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली असली तरी ती माहिती दिनांक ९.६.२००६ रोजी प्रस्तावाची परिस्थिती काय होती त्याप्रमाणे कळविण्यात आलेली आहे. जर त्यांना दिनांक २१.३.२००६ रोजी प्रस्तावाची सद्यस्थिती काय होती याबध्दलची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांनी सदरची माहिती व्यक्तीशः उपलब्ध करुन घ्यावी व त्याबध्दलची पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८७५/२००७**

१) श्री काशीनाथ धोंडप्पा भुसनूर,
रा.वसंत सह.ग्रामीण गृह निर्माण संस्था मर्या. लोहारा,
ता.जिल्हा यवतमाळ - ४४५००१. **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सचिव, महाराष्ट्र राज्य( महसुल व वने),
मंत्रालय, मुंबई -३२.

३) जन माहिती अधिकारी तथा
आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती. **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांना नोटीस काढलेली दिसून येत नाही. त्यामुळे ते गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.६.२००६ रोजी आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे माहिती मिळण्यासाठी अर्ज केल्याचे दिसून येते. सदरच्या अर्जाप्रमाणे- मा.श्री पी.एस. मणचेकर, आय.ए.एस., तत्कालीन जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी मा. आयुक्त, अमरावती यांना पाठविलेल्या सदर्हु गोपनिय पत्र दिनांक ४.९.१९९० मधील विषय व शेवटी प्रस्तावित केलेला अहवाल कार्यवाही स्वयंस्पष्ट असून अत्यंत बोलकी आहे. त्यानुसार तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, यवतमाळ श्री बी.एस.घारड व तहसिलदार यवतमाळ श्री म. इद्रीस या दोनही अधिका-यांनी रक्कम देय नसतांना बेकायदेशिर वाटप केल्यामुळे व ही रक्कम वसुल होण्याची फारशी आशा नसल्याने त्यांचे विरुध्द महाराष्ट नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे नियम ८ अन्वये कार्यवाही करण्यात यावी. एवढे स्पष्ट प्रस्तावित असताना वास्तविक नायब तहसिलदार (श्री भुसनूरवर) कार्यवाही करण्यांची

गरजच नव्हती. तरी पण ती निव्वळ पुर्वग्रह दुषीत भावनेने मनांत आकस बाळगून कार्यवाही कां करण्यात आली. व अशा प्रकारचे प्रश्नांच्या माध्यमातून अनेक मुद्यांवर माहिती मागीतलेली दिसून येते. थोडक्यात " जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी आयुक्त, अमरावती यांना दिनांक ४.९.१९९० रोजी पाठविलेल्या गोपनिय पत्रामध्ये श्री भुसनूरवर, तत्कालीन नायब तहसिलदार यांचेवर कार्यवाही करण्याबाबतचा उल्लेख नसताना त्यांचेवर कार्यवाही कां करण्यात आली याची माहितीची आवश्यकता आहे. स्पष्टीकरण नको आहे. उत्तराची माहिती हवी आहे " वगैरे माहिती मागीतलेली दिसून येते. व त्याकरीता त्यांनी टपाल खर्च, माहितीचा खर्च मिळून रुपये २०/- मनीआर्डरने पाठविलेले आहे, असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळ अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२००६ रोजी सचिव, महाराष्ट्र राज्य, महसुल व वने विभाग, यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले असे दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे माहिती मिळण्यासाठीचा अर्ज दाखल केलेला असला तरी सदरचा माहितीचा अर्ज हा आयुक्त कार्यालयातील संबंधीत माहिती अधिकारी किंवा संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतरीत करणे आवश्यक होते व तसा तो केलेला दिसून येत नाही. व त्याबध्दल कोणत्याही प्रकारचे उत्तर हे अपीलकर्ता यांना दिलेले दिसून येत नसल्यामुळे आयुक्त कार्यालयातील संबंधीत माहिती अधिकारी किंवा संबंधीत कर्मचारी किंवा अधिकारी हे दोषी आढळून येतात. व त्यामुळे त्यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. तसेच प्रथम अपील हे सचिव, महसुल व वने यांचेकडे केलेले असल्यामुळे त्यासबंधात सुध्दा महसुल व वने मंत्रालयीन विभागाने कोणत्याही प्रकारची दखल न घेता किंवा सदरच्या प्रथम अपीलाच्या संबंधातील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे न पाठविता किंवा तसे अपीलकर्ता यांना कळविलेले नसल्यामुळे अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी जी प्रश्नांच्या स्वरुपात माहिती मागीतलेली आहे ती अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे नाही. त्या

प्रश्नांच्या माध्यमातून अभिप्राय किंवा अभिमत व्यक्त होईल अशी माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात अभिलेखे, दस्तऐवज, टिपणी, परिपत्रके, शासन निर्णय इ. स्वरुपात माहिती उपलबध करुन देणे हे अपेक्षीत आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी विभागीय चौकशीच्या संबधामध्ये जी कारणे विचारलेली आहेत त्या कारणांचे उत्तर हे अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे अपेक्षित नाही. परंतु, असे असले तरी त्यांचा दिनांक २२.६.२००६ च्या अर्जाची दखल घेवून त्यांना उत्तर देणे आवश्यक होते. तसे झाले असते तर त्यांना प्रथम अपील किंवा द्वितीय अपील दाखल करण्याची आवश्यकता भासली नसती. व त्यामुळे आयुक्त कार्यालयातील संबंधीत माहिती अधिकारी किंवा कर्मचारी किंवा अधिकारी जे सदरचा अर्ज हाताळण्यासाठी सक्षम असतील अशांची जबाबदारी निश्चित करुन विभागीय चौकशी करणे आवश्यक राहील.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना विहिती मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे सदरच्या दिनांक २२.६.२००६ च्या अर्जाचे संबंधामध्ये जे माहिती अधिकारी जबाबदार असतील त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे त्यांची विभागीय चौकशी करण्यात यावी व तसा अहवाल आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून ३ महिन्यांचे आंत सादर करण्यात यावा.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, अमरावती यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं.२००७/८११/०२**

१) श्री फकिरा तुकाराम जाधव,
मु.पो.लोटणापूर बाळापूर,
ता. बाळापूर, जिल्हा अकोला. **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला

३) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, बाळापूर
ता.बाळापूर, जिल्हा अकोला. **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांच्या सदरच्या अपीलाचा निर्णय हा दिनांक ५.२.२००७ रोजी देण्यात आलेला होता. सदरच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांस माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय देण्यात आल्यामुळे व अपीलकर्ता यांनी सदरच्या निर्णयाप्रमाणे दिनांक ७.३.२००७ रोजी माहिती मिळण्यासाठी विनंती अर्ज सादर केला होता. त्या विनंती अर्जाप्रमाणे दिनांक ३०.३.२००७ ला त्यांना मागणी केलेली माहिती बाबत या कार्यालया मार्फत पत्राद्वारे कळविण्यात आले हाते. श्री जाधव स्वत: माहिती घेण्यास आले नाही. त्यामुळे या कार्यालयाच्या शिपाया मार्फत त्यांचे पत्यावर माहिती पाठविण्यात आली. दिनांक ५.४.२००७ रोजी ते घरी मिळाले नाही. दिनांक ७.४.२००७ रोजी ते घरी मिळून आले नाही. दिनांक ९.४.२००७ रोजी समक्ष शिपायाने त्यांची पोच घेतली असता माहिती घेण्यासाठी त्यांनी नकार दिला. त्यामुळे दिनांक १३.४.२००७ रोजी पंजीबध्द डाकेने अर्जदार यांना त्यांचे पत्यावर माहिती पाठविली होती. व सदरची माहिती स्पीड पोस्टाने आयोगाच्या कार्यालयात सुध्दा पाठविण्यात आलेली होती. माहिती देण्यासाठी प्रयत्न झालेला आहे परंतु माहिती घेण्यासाठी नकार दिल्यामुळे पंजीबध्द डाकेने माहिती पाठविण्यात आली. या कार्यालयाने मा.राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे पालन केलेले आहे. व त्यामुळे दिनांक ३०.३.२००७ चे नोटीशीत नमुद केलेल कलम २० (१) ची कार्यवाही आदेशाचे पालन झाल्यामुळे करण्यात येऊ नये ही विनंती अशी विनंती केलेली आहे. सोबत दिनांक ३०.३.२००७ चे पत्राची प्रत

रजिस्टर अे.डी. पावतीची छायाप्रत, शिपायाने दिलेल्या अहवालाची प्रत दाखल केलेली असल्यामुळे सदरचे दिनांक २४.४.२००७ चे अपीलकर्ता यांचे पत्र किंवा तक्रार हे सर्व खारीज करण्यात येत आहे.

**.नागपूर**

**दिनांक १७.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील  माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं.८८३ /२००७**

१) श्री मिनाक्षी नामदेव जाधव,
रा.रामनगर कॅालेज जवळ मेहकर,
ता.मेहकर, जिल्हा बुलढाणा-४४३३०१. **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),
जिल्हा परिषद, बुलढाणा.

३) जन माहिती अधिकारी तथा
सचिव, गांधी स्मारक शिक्षण संस्था मेहकर,
त्र्यंबक शिवराम सावजी जनता हायस्कुल मेहकर,
ता.मेहकर, जिल्हा बुलढाणा - ४४३३०१. **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ती हिने सदरचे अपील दिनांक २१.८.२००६ रोजी दाखल केले होते. सदरचे अपील दिनांक ६.६.२००६ च्या अर्जाच्या अनुषंगाने असल्यामुळे दिनांक ६.६.२००६ च्या अर्जाच्या अनुषंगाने पुन्हा दिनांक १८.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक २२६/२००७ दाखल केले होते. सदरच्या द्वितीय अपीलाचा निर्णय दिनांक १७.७.२००७ रोजी दिलेला असल्यामुळे एकाच अर्जाच्या संबंधात व एकाच अर्जात मागीतलेल्या माहितीच्या संबधामध्ये दोन द्वितीय अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देणे हे अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ८८३/२००७ निकाली काढण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर/अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये**

**अपील क्रं. ८८४/२००७**

१) श्री नामदेव सवाई जाधव,
रा.रामनगर कॅालेज जवळ मेहकर,
ता.मेहकर, जिल्हा बुलढाणा-४४३३०१. **अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,
गांधी स्मारक शिक्षण संस्था, मेहकर
त्र्यंबक शिवराम सावजी जनता हायस्कुल मेहकर,
ता.मेहकर, जिल्हा बुलढाणा - ४४३३०१

३) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),
जिल्हा परिषद, बुलढाणा.

४) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, त्र्यंबक शिवराम सावजी जनता हायस्कुल मेहकर,
ता.मेहकर, जिल्हा बुलढाणा - ४४३३०१. **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर असून अपीलकर्ता यांचे वकील श्री विजय हिंमतराव बाजड हजर आहे. गैरअर्जदार यांचे वकील श्री अशोक एम. सावजी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी " दिनांक ६.६.२००६ रोजी १) कार्यरत असलेल्या शिक्षकांची सन १९९४ पासून तर २००४ पर्यंतची सेवा जेष्ठता योदी. २) आपल्या आस्थापनेत कार्यरत शिक्षकांचे नांव प पद आणि त्यांचे वर्कलोड शिक्षणासह यादी मिळण्याबाबत. (सोबत पद मान्यतेच्या दुय्यम प्रतीसह) सन १९९४ पासून २००४ पर्यंत. माहिती व्यक्तीशः घेणार " असे नमूद केले आहे. सदरच्या झेरॅाक्स प्रतीवर मुख्याध्यापक यांचे सिल असून ५/- रुपयाचे कोर्ट फि स्टॅम्प लावलेले आहे. मात्र, सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २५.७.२००७ रोजी मुख्याध्यापक, त्र्यंबक शिवराम सावजी जनता हायस्कुल मेहकर,ता.मेहकर, जिल्हा बुलढाणा यांनी " आपण पाठविलेले माहिती अधिकार २००५ दिलेला अर्ज या संस्थेला प्राप्त झाला. परंतु तो मुळ अर्ज नसून त्याची झेरॅाक्स प्रत आहे. झेरॅाक्स प्रतीची दखल घेता येत

नाही. २) आपण मागविलेली माहिती गोपनियतेच्या सदरात मोडत असल्यामुळे ती माहिती देता येत नाही. तारीख ०६.०६.२००६ रोजी आपण आपल्या पत्नीच्या सहीने अशाच स्वरुपाचा अर्ज पाठवून त्याद्वारे काही माहिती मागविण्याचा प्रयत्न केला. त्या पत्राला सविस्तर वेगळे उत्तर दिलेले आहे. म्हणून तेही उत्तर संदर्भ म्हणून आपल्या अर्जाला समजण्यात यावे, " अशी विनंती केलेली दिसून येते.

३. सदरच्या निर्णयाने व्यथित होऊन दिनांक २७.७.२००६ रोजी श्री नामदेव सवाई जाधव व सौ.मिनाक्षी नामदेव जाधव यांनी मा.शिक्षणाधिकारी साहेब (माध्य.), जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु दिनांक २२.१२.२००६ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी " खाजगी शाळेच्या बाबतीत माहिती अधिकारी हे मुख्याध्यापक असून प्रथम अपीलीय अधिकारी संस्थेचे सचिव/अध्यक्ष हे आहे. तरी आपण प्रथम अपील त्यांचेकडे करावे." असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे सदरच्या आदेशाप्रमाणे अपीलकर्ता यांनी सचिव/अध्यक्ष यांचेकडे दिनांक २६.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ३.२.२००७ रोजी माहितीच्या अधिकारा अंतर्गत " आपण मागीतलेली माहिती पुरविण्यास नकार देणारी मा. मुख्याध्यापक यांच्या उत्तराची प्रत आपण अपीलास जोडलेली नाही. मा. मुख्याध्यापक यांनी यापूर्वीच आपणास सविस्तर उत्तर दिलेलेच आहे. आवश्यक कागदपत्रांची पाहणी केल्यानंतर त्यापेक्षा आणखी उत्तर देण्याचे काहीही कारण नाही, " असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने व्यथीत होऊन अपलकर्ता यांनी राजय माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. अपीलकर्ता यांचे दिनांक ६.६.२००६ च्या अर्जाच्या संदर्भात तपासणी केली असता व संस्थेच्या मुळ नस्तीची तपासणी केली असता असे दिसून यते की, संस्थेच्या नस्तीमध्ये सुध्दा छायांकित प्रत आहे. परंतु अपीलकर्ता यांचे त्यावर असे म्हणणे आहे की, मुळ प्रतीच्या अर्जाची छायांकित प्रत नस्तीमध्ये ठेवलेली असल्यामुळे त्यातील त्यांना काहीही सांगता येणार नाही. परंतु दिनांक ६.६.२००६ च्या अर्जास नियमाप्रमाणे रुपये १०/- चे कोर्ट फी स्टॅम्प लावणे आवश्यक होते. परंतु रुपये ५/- चे कोर्ट फी स्टॅम्प लावलेले दिसून येत आहे. या तांत्रिक बाबीचा विचार केल्यास सकृत दर्शनीच अर्जाचे संबंधात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु तरी सुध्दा मुख्याध्यापक यांनी अर्जात

मागीतलेल्या माहितीच्या संदर्भात सुध्दा दिनांक २५.७.२००६ च्या पत्रात उत्तर दिलेले असल्यामुळे सदरच्या छायांकित प्रतीची दखल घेता येत नाही असे म्हणताना विचारलेल्या माहितीच्या बध्दल सुध्दा उत्तर दिलेले असल्यामुळे सदरच्या अर्जावर त्यांनी प्रक्रिया केलेली आहे हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. मात्र प्रथम अपीलाच्या संबंधामध्ये सुनावणी घेतलेली दिसून येत नाही. सुनावणी न घेताच उत्तर दिलेले दिसून येते.

५. अपील या संज्ञेमध्ये नैसर्गिक न्यायाच्या तत्वाप्रमाणे दोनही पक्षकारांचे म्हणणे ऐकून सुनावणी घेऊन निर्णय देणे अपेक्षीत असते. कोणत्याही प्रकारचे प्रशासकिय आदेश किंवा पत्राचे उत्तर हा अपीलाचा निर्णय होऊ शकत नाही. अपीलाचा निर्णय हा कारण मिमांसा सहित व आदेशा सहित असावा लागतो व तो तसा प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव, गांधी मेमोरीयल सोसायटी यांनी घेतलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता व उत्तरवादी यांच्या तांत्रिक त्रुटींचा विचार केल्यास दोनही बाजूंनी नियम पाळलेले नाहीत. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदींचा उद्येश हा प्रामुख्याने माहिती उपलब्ध करुन देणे असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांनी मागीतलेल्या अर्जातील मुद्या क्रमांक १ ची माहिती ही अपील क्रमाक २२६/२००७ च्या निर्णया मध्ये अपीलकर्ती मिनाक्षी नामदेव जाधव ही सदरच्या अपीलातील अपीलार्थीची पत्नी असल्यामुळे व त्याबाबत माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संबंधात आदेश दिलेला असल्यामुळे सदरच्या मुद्याचे संदर्भात आदेश देण्याची आवश्यकता नाही. परंतु, मुद्या क्रमांक २ च्या संबधामध्ये सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांचे दिनांक ६.६.२००६ च्या अर्जाच्या प्रमाणे मुद्या क्रमांक २ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत खर्चाची निश्चित रक्कमेची माहिती व्यक्तीशः घ्यावी व त्याप्रमाणे खर्चाचा भरणा करुन घेवून व त्यानंतर १० दिवसांत

माहिती घ्यावी. माहिती व्यक्तीशः घेणार असल्यामुळे माहिती व्यक्तीशः अपीलकर्ता आल्यावर उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) मुद्या क्रमांक १ च्या संबंधात अपील क्रमांक २२६/२००७ मध्ये निर्णय झालेला असल्यामुळे त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकत नाही.

३) अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडून मागीतलेल्या माहितीचे संबंधात खर्चाची रक्कम व्यक्तीशः जावून घेतल्यानंतर व्यक्तीशः खर्चाचा भरणा हा जन माहिती अधिकारी यांचेकडे करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व त्याची पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.१.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**